सस्नेह निमंत्रण!

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त

सुवर्ण 50 महोत्सव

31 मार्च 2014 अखेरच्या सभासदांना

प्रत्येकी रु. 5,100/- भेट पावती

एकुण रु. 4 कोटी 75 लाख

मुदत ठेव पावतीचे वितरण समारंभ

अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि.
(शेड्युल्ड बँक) अहिल्यानगर

मंगळवार दि. २४ नोव्हेंबर २०२६ | वेळ : सकाळी १०.३० वाजता

स्थळ : सहकार सभागृह, अहिल्यानगर

• अध्यक्ष •



मा. ना. श्री. रामजी शिंदे
सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य

• शुभहस्ते •



मा. ना. श्री. बाबासाहेबजी पाटील
सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. श्री. हस्तीमलजी मुनोत
बँकेचे संस्थापक चेअरमन व विद्यमान संचालक

• प्रमुख पाहुणे •



मा.ना.श्री. राधाकृष्णजी विखे पाटील
जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहिल्यानगर



मा.ना.श्री. जयकुमारजी गोरे
ग्रामविकासमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री. निलेशजी लंके
खासदार, नगर दक्षिण



मा.श्री. संग्रामभैय्याजी जगताप
आमदार, विधानसभा सदस्य, अहिल्यानगर

सर्व भागधारक, ठेविदार, खातेदार व हितचिंतक यांनी मोठ्या संखेने उपस्थित रहावे, हि नम्र विनंती.

• निमंत्रक व प्रेषक •



संजय फुलचंद चोपडा
चेअरमन



अमित विजयकुमार मुथा
व्हाईस चेअरमन



अनिल हिरालाल पोखरणा
अध्यक्ष, सुवर्णमहोत्सव विशेष समिती

• मा. संचालक मंडळ •

कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सी.ए. आय.पी. अजय मुथा
सी.ए. मोहनलाल बरमेचा, किशोर मुनोत, ॲड. संजीव गांधी, सुभाष बायड, श्रीमती प्रमिलाबाई बोरा
श्रीमती मिनाताई मुनोत, विजय काथिंबीरे, सुभाष भांड, जितेंद्र बोरा (सेवक प्रतिनिधी), प्रसाद गांधी (सेवक प्रतिनिधी)
नितीन भंडारी (मुख्य कार्यकारी अधिकारी)

• मा. बोर्ड ऑफ मॅनेजमेंट •

सी.ए. आय.पी. अजय मुथा (चेअरमन) | किशोर मुनोत | राजेश झंवर | पेमराज बोथरा | सी.ए. प्रविन कटारिया

Pragmatic Designs

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, शनिवार दि. २१.११.२०२६ अंक नं. ११५ वर्ष ६९ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020

सस्नेह कृतज्ञता...

मनःपूर्वक आभार!

समर्पण



ॲड. शिवाजीराव काकडे
अध्यक्ष-कार्यसेवी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह, शेवगाव.



सौ. हर्षदाताई काकडे
माजी सभापती-महिला व बालकल्याण समिती, जि.प. अहिल्यानगर

यांनी समर्पण चातुर्मास २०२६ च्या चार महिन्यांच्या आयोजनासाठी आपल्या संस्थेची भूमी अत्यंत उदार मनाने विनामूल्य उपलब्ध करून दिली.

त्यांच्या या उदात्त सहकार्यामुळेच अहिल्यानगरमध्ये धर्माराधना, तप, त्याग, साधना आणि आत्मकल्याणाचा हा अविस्मरणीय उत्सव दिमाखात साकार होऊ शकला. धर्मकार्याप्रति असलेली त्यांची अढळ श्रद्धा, निःस्वार्थ सेवाभाव आणि औदार्य याबद्दल आम्ही अंतःकरणपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

आपल्या अमूल्य सहकार्याबद्दल आभार!

समर्पण चातुर्मास समिति, अहिल्यानगर
चातुर्मास प्रमुख लाभार्थी - श्री. सौरभ प्रमिलाताई हेमराजजी बोरा

- जाहिरात सौजन्य -

चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञांचा सल्ला

सन २०१० पासून



मुलाच्या शालेय प्रगतीसाठी व बुद्धी विकासासाठी

चिरायु
लहान मुलांचे क्लिनिक

मो.९५२७९३१३८४/८८३०४००१७०

१ सबजेल चौक,तुळजाभवानी मंदिरा समोर,(सावमंड बेकरीसमोर) अहिल्यानगर.

ना नफा ना तोटा पहिली तीन वर्ष.. कृपया त्याचा फायदा घ्या
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा

रत्नकमल™ चहा



दिवाळी धमाका पॅकेटमध्ये कुकर, दहा किलो पिशवी, आरती संग्रह, पाऊच यांचे रँडमली कुपन



इतर कंपन्यांपेक्षा ५० ते ७० रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम..

ब्रँडेड कंपनीचा चहा व **रत्नकमल चहा** एक वेळेस जरुर तुलना करुन पहा

आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर,अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367

व्यापार उद्योगात घेण्या अधिक उंच भरारी.

मर्चन्टस् ची लक्ष्मी आणा तुमच्याही दारी

होय आम्ही मर्चन्टस् बँक परिवारात आहोत .. कारण

येथे लक्ष्मी वास करते...

सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंदाचे
अभिनंदन व शुभेच्छा !

सभासदांना रु. ५१००/- भेट पावती देण्यासाठी होणाऱ्या सोहळ्यास आमच्याही शुभकामना !

सुभाष गांधी व परिवार

Gandhi Construction
शिरुर - अहिल्यानगर - पुणे

सागर पवार

MIRACLE STAMPING & SLITTING INDUSTRIES
Plot no - L-135/5/2 Nagapur MIDC , Ahilyanagar 414111

यश-कुणाल-मुकेश गांधी व परिवार

श्री निलकंठ इंजिनिअर्स प्रा. लि.
Staging - Centering - Shuttering
सी ६/१४, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर

Dishan

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन - २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

सोन्याचे दागिने : गुंतवणूक की हौस?


राजन कुटे

सोन्याचे दागिने खरेदी करताना आपण अनेकदा त्याकडे गुंतवणूक म्हणून पाहतो. सोन्याचा भाव वाढला की आपल्या दागिन्यांची किंमतही वाढली असे वाटते. त्यामुळे दागिने खरेदी करण्याचा निर्णय घेताना त्यामागे हौस, परंपरा, सुरक्षिततेची भावना आणि गुंतवणूक अशा अनेक गोष्टी एकत्र असतात.

मात्र, सोन्याचे दागिने आणि सोन्यातील गुंतवणूक या दोन गोष्टी एकसारख्या नाहीत, हे समजून घेणं महत्त्वाचं आहे. दागिना खरेदी करताना आपण फक्त सोन्याची किंमत देत नसतो.

त्यामध्ये सोन्याच्या वजनानुसार किंमत, घडणावळ (Making Charges), काही वेळा घट आणि लागू कर यांचाही समावेश असतो. म्हणजेच, आपण जेवढी रक्कम खर्च करतो, तेवढ्या रकमेचं सोने आपल्या हातात येत नाही.

दागिना विकण्याची किंवा बदलण्याची वेळ आली, तर त्याचं मूल्य ठरवताना सोन्याची शुद्धता, प्रत्यक्ष वजन, त्या वेळचा सोन्याचा भाव आणि खरेदीदाराची पद्धत विचारात घेतली जाते. खरेदीच्या वेळी दिलेली घडणावळ आणि इतर खर्च परत मिळतीलच असं नाही.

याचा अर्थ सोन्याचे दागिने घेणं चुकीचं आहे, असा अजिबात नाही. दागिन्यांचा उपयोग केवळ आर्थिक नसतो. ते परंपरेचा भाग असू शकतात, एखाद्या प्रसंगाची आठवण असू शकतात किंवा वैयक्तिक आनंदाचं कारणही असू शकतात. या मूल्यांची तुलना केवळ आर्थिक परताव्याशी करता येत नाही.

पण उद्देश जर संपत्तीमध्ये सोन्याचा समावेश करून गुंतवणूक करणे हा असेल, तर दागिने हा एकमेव किंवा सर्वात कार्यक्षम पर्याय आहे का, याचा विचार करायला हवा.

सोन्यात गुंतवणूक करण्यासाठी प्रत्यक्ष सोने, गोल्ड ETF किंवा इतर उपलब्ध पर्याय असू शकतात. प्रत्येक पर्यायाची रचना, खर्च, जोखीम, साठवणूक, तरलता आणि करपद्धती वेगवेगळी असते. त्यामुळे पर्याय निवडताना स्वतःची गरज आणि गुंतवणुकीचा उद्देश लक्षात घेणं आवश्यक आहे.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या एकूण मालमत्तेपैकी किती हिस्सा सोन्यात असावा. सोन्याचा भाव वाढतो आहे म्हणून सतत सोने खरेदी करणं किंवा भाव घसरतो आहे म्हणून पूर्णपणे दूर राहणं, या दोन्ही प्रतिक्रिया विचारपूर्वक घेतलेल्या आर्थिक निर्णयांची जागा घेऊ शकत नाहीत.

गुंतवणुकीत प्रत्येक गोष्टीचं मूल्यमापन तिच्या उद्देशानुसार व्हायला हवं. दागिना आनंदासाठी घेत असाल, तर त्याचा आनंद घ्या. पण तोच दागिना भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेचा प्रमुख आधार आहे, असं गृहीत धरू नका.

शेवटी, सोनं मौल्यवान आहे; पण ते कोणत्या स्वरूपात आणि कोणत्या उद्देशाने आपल्या मालमत्तेत आहे, हे त्याहून महत्त्वाचं आहे.

कारण सोन्याची एक महत्त्वाची मर्यादा लक्षात घेणं आवश्यक आहे. सोनं स्वतःहून कोणतंही उत्पन्न किंवा रोख आवक निर्माण करत नाही. व्यवसायाप्रमाणे नफा, मालमत्तेप्रमाणे भाडं किंवा ठेवीप्रमाणे व्याज यातून मिळत नाही. त्याची किंमत प्रामुख्याने त्याची मागणी, मर्यादित उपलब्धता आणि बाजारातील स्वीकारार्हता यावर अवलंबून असते. त्यामुळे सोन्याची किंमत वाढू शकते; मात्र ते स्वतःहून उत्पादक संपत्ती निर्माण करत नाही.

कारण योग्य आर्थिक निर्णयाची सुरुवात वस्तूच्या आकर्षणापासून नव्हे, तर तिच्या उपयोगाची स्पष्टता समजून घेण्यापासून होते.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

- **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक मालवाहतूक करणाऱ्या वाहनांची नगर शहरातून सर्रासपणे होतेय वाहतूक

ओव्हरलोड वाहनांवर कारवाई करून 'क्युआर कोड' प्रणालीद्वारे होणाऱ्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करा अन्यथा आरटीओ कार्यालयात आंदोलन

नगर - नगर शहरातून मालवाहतूक करणारे वाहने निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक मालाची सर्रासपणे वाहतूक करत असून आरटीओ अधिकारी व कर्मचारी कोणावर मोठ्या रक्कमेचा दंड तर कोणावर काहीच नाही आशी मनमानी पद्धतीने कारवाई करत आहेत. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयातील काही अधिकारी आणि विशिष्ट मालवाहतूक व्यावसायिक यांच्यामध्ये क्युआर कोडच्या माध्यमातून होणाऱ्या देवाणघेवाणीने मोठ्य प्रमाणात होणाऱ्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करावी, अन्यथा शहर व भिंगार भाजपच्या वतीने आरटीओ कार्यालयात तीव्र आंदोलन करण्यात येईल, या इशाऱ्याचे व विविध मागण्यांचे निवेदन भिंगार मंडलाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रादेशिक परीवन अधिकारी विनोद सगरे यांना दिले.


नगर शहरातून होणाऱ्या ओव्हरलोड मालवाहतूक वाहनांवर समान व नि:ष्पक्ष कारवाई करून 'क्युआर कोड' प्रणालीद्वारे होणाऱ्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याच्या मागणीचे निवेदन भिंगार भाजपाच्या मंडलाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रादेशिक परीवन अधिकारी विनोद सगरे यांना दिले. यावेळी शहर जिल्हा सरचिटणीस महेश नामदे, मंडलाध्यक्ष सचिन जाधव, अनिल गट्टानी, निलेश साठे, राजेंद्र फुलारे, भार्गव फुलारे, प्रकाश रासकर, श्रीगोपाल जोशी, ॲड. अमोल निस्ताने आदींसह पदाधिकारी.

शहर जिल्हा सरचिटणीस महेश नामदे यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात मंडलाध्यक्ष सचिन जाधव, अनिल गट्टानी, निलेश साठे, राजेंद्र फुलारे, भार्गव फुलारे, प्रकाश रासकर, श्रीगोपाल जोशी, नंदू पवार, रमेश पाटील व ॲड. अमोल निस्ताने यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते. प्रादेशिक परीवन अधिकारी विनोद सगरे याबाबत चौकशी करून कारवाईचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अहिल्यानगर शहर व परिसरातून अनेक मालवाहतूक वाहने निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करत असल्याने रस्त्यांची हानी, वाहतूक कोंडी तसेच अनेक छोटेमोठे अपघात होत आहेत. त्यामुळे आशा ओव्हरलोड वाहनांवर कडक कारवाई होणे आवश्यक असताना आरटीओ अधिकारी व कर्मचारी कोणावर कडक दंडात्मक तर कोणावर काहीच नाही आशी मनमानी पद्धतीने कारवाई करत आहेत. विशेष म्हणजे काही ठराविक वाहनांना आर्थिक देवाणघेवाणीने कारवाईपासून संरक्षण दिले जात असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. या तक्रारींची सत्यता तपासणे आवश्यक आहे. संबंधित बाबींमध्ये तथ्य आढळल्यास दोषी अधिकारी, कर्मचारीवर कठोर कारवाई करण्यात यावी.

आरटीओ विभागातील काही अधिकारी व कर्मचारी आता नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून क्युआर कोडच्या माध्यमातून सर्रासपणे भ्रष्टाचार करत आहेत. काही मालवाहतूक वाहनचालकांना हा विशिष्ट क्युआर कोड उपलब्ध करून दिला जातो. संबंधित वाहनाची तपासणी करताना वाहनचालकाकडून हा क्युआर कोड अधिकाऱ्यांना दाखवला जातो. त्यानंतर संबंधित अधिकारी आपल्या मोबाईलद्वारे सदर कोड स्कॅन करून संबंधित वाहन हे त्यांच्या विशिष्ट अथवा प्राधान्यक्रमाच्या यादीमध्ये आहे किंवा नाही, याची पडताळणी करतात. त्यानंतर अशा वाहनांवर नियमित कायदेशीर कारवाई न करता त्यांना पुढील प्रवासासाठी सोडून दिले जाते, असे निदर्शनास आले आहे. जर अशा प्रकारची कोणतीही यंत्रणा अस्तित्वात असेल, तर ती अत्यंत गंभीर असून भ्रष्टाचाराला राजरोसपणे खतपाणी घालणारी आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.

आरटीओ अधिकारी काही ठराविक वाहनांकडून नियमित आर्थिक देवाणघेवाण करून त्यांना कारवाईपासून संरक्षण देत आहेत. याची स्वतंत्र व निष्पक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी. अन्यथा अहिल्यानगर व भिंगार भाजपच्या माध्यमातून आरटीओ कार्यालयात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

मोटरसायकलची चोरी

नगर - शहरातील छत्रपती संभाजीनगर रोड वरील ताज गार्डन परिसरातून अज्ञात चोरट्याने एक मोटरसायकल चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत भगवान बाबासाहेब सानप (वय ३७ वर्षे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मोटरसायकल (क्र. एमएच १६ बीएस ६५५३) १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.०६ ते रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान ताज गार्डन परिसरातून अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी २० नोव्हेंबर रोजी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

कत्तलीसाठी गायींची खरेदी करणाऱ्यांविरोधात आता थेट मोक्का लावणार

गोशाळेसाठी जमीन खरेदी, दानपत्र, भाडेकरार करताना यापुढे व्यावसायिक दर लागू होणार नाहीत

नगर - राज्यातील गोशाळेसाठी जमीन खरेदी, दानपत्र, भाडेकरार करताना यापुढे व्यावसायिक दर लागू होणार नाहीत. तसेच रहिवाशी दरही लागू नसतील. तर कृषी दर लागू होतील. गोशाळेच्या बळकटीकरणासाठी राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान हा निर्णय घेतानाच राज्य सरकारने गायींची कत्तल करणाऱ्यांविरोधात कडक कारवाईची भूमिका घेतली आहे. कत्तलीसाठी गायींची खरेदी करणाऱ्यांविरोधात आता थेट मोक्का लावण्यात येणार आहे.



गोशाळा ही सेवाभाव जपते. गोवंश नष्ट करणाऱ्यांकडून गाई सोडवून गोशाळा चालते. गोशाळेला चारा लागवड करावी लागते. हा एक प्रकाराचा कृषी व्यवसाय आहे. मला असे वाटते की या व्यवसायाला, सेवाभावाला शासन अनुदानही देते. अशावेळी गोशाळाच्या जमिनीकरता घेतलेला कोणताही व्यवसाय असेल. तो कृषीदरानेच होईल. तो रहिवाशी जमीन खरेदी-विक्री दराने होणार नाही. यापूर्वी याविषयी कोणतीही स्पष्टता नव्हती. त्यामुळे व्यावसायिक अथवा रहिवाशी दर लावण्यात येत होते. पण गोशाळा या शंभर टक्के सेवाभावी आहे. त्यामुळे गोशाळा जमीन खरेदी, दानपत्र, भाडेकरार करताना व्यावसायिक दर लावण्यावर बंदी घातल्याची मोठी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

डीपीसीच्या माध्यमातून २५ लाखांचे अनुदान

डीपीसीच्या माध्यमातून अधिकृत गोशाळांना २५ लाख रुपये अनुदान देण्याचे उद्दिष्ट आम्ही निश्चित केले आहे. त्यामुळे गोशाळा चालवणे सोपे जाईल. असा एक निर्णय आपण केला आहे. जास्तीत जास्त गोशाळा व्हाव्यात. गोवंश वाढावा. गोवंश कापल्या जाणार नाही. काही कारणामुळे अथवा घाबरून जे गोवंश विक्री करतात, ते गोशाळेला गायी देतील. सरकार जनावरांसाठी संपूर्ण व्यवस्था करत आहे. पाणी, चाऱ्याची, गोवंशासंबंधी व्यवस्था करत आहे. आता दुष्काळाचा फायदा घेऊन काही जण शेतकऱ्यांकडे जात आहेत. त्यांच्याकडे जनावरांची मागणी करत आहेत. गोवंश पोसण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. गोशाळेने जबाबदारी घेतली आहे, गोवंश पोसण्याची. चारा लागवडीची आणि चारा देण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे, असे महसूलमंत्री म्हणाले.

राज्यात गोवंश कापणाऱ्यांचा सुळसुळाट

राज्यात गोवंश कापणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. दुष्काळाचा हे लोक फायदा घेत आहेत. त्यांच्यावर आम्ही मोक्का लावू. गोवंश खरेदी करणारे, कापणारे यांच्यावर मोक्का लावणार असल्याची मोठी घोषणा महसूलमंत्री बावनकुळे यांनी केली. ज्यांनी गाय कापण्यासाठी तिची खरेदी केली. त्याच्यावर मोक्का लावणार असा सज्जड इशाराच बावनकुळे यांनी दिला. या करिता आम्ही गोशाळांना प्रोत्साहन देत आहोत. त्यांना बळ देत आहोत. चारा लागवड करत आहोत. चारा पुरवत आहोत.शेतकऱ्यांच्या पाठीशी आमचे सरकार आहे. आमचं मंत्रिमंडळ शेतकर्यांच्या पाठीशी आहे. गोशाळेला मजबूत करणार असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

नगर मधील बिबट्याचा मानवी वस्तीत फेरफटका; पिंजऱ्याला देतोय हुकावणी

नगर - नगर शहराजवळ छत्रपती संभाजीनगर रोडवर असलेल्या लष्कराच्या सीक्युएव्ही परिसरात गेल्या ५-६ दिवसांपासून ठाण मांडून बसलेल्या बिबट्याने २१ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास या परिसरातून बाहेर पडत दाट नागरी वस्ती असलेल्या तारकपूर मधील प्रकाशपूर परिसरात फेरफटका मारला. त्यानंतर काही वेळातच तो पुन्हा सीक्युएव्ही परिसरात गेल्याचे समोर आले आहे. या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने पिंजरा लावला असून तो सातत्याने त्या पिंजऱ्याला हुलकावणी हुलकावणी देत आहे.

या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाचे पथक रात्रंदिवस या परिसरात तळ ठोकून आहे.मात्र बिबट्या या पथकाला सतत हुलकावणी देत आहे. वन विभाग या परिसरात लावलेल्या पिंजऱ्यांची जागाही बदलत आहे, मात्र तो पिंजऱ्याकडे फिरकतच नसल्याचे सांगण्यात येत आहे.

मात्र बिबट्याची हालचाल वेगवान असल्याने तसेच या परिसरात झाडी झुडपे मोठ्या प्रमाणावर असल्याने वनविभागाचे पथक हतबल झाले आहे. वनविभागाने जर जास्त मोठ्या प्रमाणात हालचाली करत बिबट्याला पकडण्याचा प्रयत्न केला तर तो सीक्युएव्ही लगत असलेल्या सावेडी उपनगरातील लोकवस्तीत घुसण्याची शक्यता आहे. त्यामुळे वनविभाग सावधगिरीची भूमिका घेत असल्याचे वनपरिक्षेत्राधिकारी अविनाश तेलोरे यांनी सांगितले.

तर बिबट्या अधून मधून रात्रीच्या वेळी सीक्युएव्ही परिसराच्या मागील बाजूने मानवी वस्तीत येत असल्याने या परिसरात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे. नागरिक रात्रीच्या वेळी घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत. या बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करत आहेत. दरम्यान महापौर ज्योती गाडे यांनीही वन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. बिबट्या लष्कराच्या सीक्युएव्ही परिसरात असल्याने लष्कराचे अधिकारी व जवानही वन विभागाची मदत करत असल्याचेही सांगण्यात आले.

पोलीस अधिक्षक कार्यालयात बनावट नावाने तक्रार अर्ज

नगर - अहिल्यानगर येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात अज्ञात व्यक्तीने शशीकांत रामदास मगर (वय ३७, रा. मगर मळा, ससेवाडी रोड, जेऊर, ता.नगर) यांच्या नावाने खोटा अर्ज तयार करून त्यांची खोटी सही करून तो तक्रार अर्ज पोलीस अधिक्षक कार्यालयासह इतर शासकीय कार्यालयांना पोस्टाने पाठविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

ही घटना ३० ऑक्टोबर रोजी घडली असून याप्रकरणी २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी शशीकांत मगर यांनी दिलेल्या फिर्यादी वरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३४० आणि ३३६(४) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादी शशीकांत मगर हे शेतीचा व्यवसाय करतात आणि त्यांच्याच नावाचा व ओळखीचा गैरवापर करून हा बनावट अर्ज तयार करण्यात आला आहे. अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या नावाने बनावट सही करून सदर अर्ज खरा असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला आहे. हा बनावट अर्ज शासकीय कार्यालये आणि विविध प्राधिकरणांकडे पोस्टाने पाठवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. अर्ज पाठवताना फिर्यादीचे नाव तसेच ते वापरत असलेल्या या मोबाईल क्रमांकाचा गैरवापर करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणातील आरोपी अद्याप अज्ञात असून, त्याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

तपोवन रोडवरून मोटरसायकलची चोरी

नगर - सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील नाना चौक परिसरातून हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटरसायकल (क्र. एमएच १७ ७५६०)अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजता घडली आहे. याबाबत किरण अर्जुन शिंदे (वय ३० वर्षे, रा. नाना चौक, तपोवन रोड, अहिल्यानगर) यांनी २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पुष्पाबाई सामल यांचे दु:खद निधन



नगर - भराडगल्ली, नेहरू मार्केट येथील रहिवासी श्रीमती पुष्पाबाई सुधाकर सामल (वय ७४) यांचे २० नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ५ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष सामल यांच्या त्या मातोश्री होत.

लक्ष्मीबाई दिकोंडा यांचे अल्प आजाराने निधन

नगर - कलानगर गुलमोहर रोड, सावेडी येथील रहिवासी सौ. लक्ष्मीबाई दिकोंडा (वय ७०) यांचे २० नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २१ नोव्हेंबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, जावई, दीर असा परिवार आहे. पीडब्ल्यूडी मधून निवृत्त विजय दिकोंडा यांच्या पत्नी तर योगाचार्य दत्ता दिकोंडा यांच्या त्या भावजयी होत.




लिलाबाई गिरमकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - अजनूज येथील रहिवासी श्रीमती लिलाबाई निवृत्ती गिरमकर (वय ९५) यांचे २० नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २१ नोव्हेंबर रोजी अजनूज भिमा नदीतिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे माजी संचालक वसंत (बापू) गिरमकर, गोरख गिरमकर, विजय गिरमकर यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



विहिरीत पडून बिबट्याचा मृत्यू

श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर येथील गावठाणातील सार्वजनिक विहिरीत पडून सुमारे दोन वर्षे वयाच्या बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. विहिरीत बिबट्या पडल्याचे समजताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या मदतीने अथक प्रयत्न करून बिबट्याचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राजगुडे यांनी बिबट्याचे शवविच्छेदन केले. आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वनविभागाच्या वतीने बिबट्यावर अंत्यविधी करण्यात आला.सहाय्यक वनसंरक्षक गणेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली भगत, वनपाल रवींद्र तुपे, हौसराव गारुडकर, राजेंद्र जाधव, दिनेश हुंबरे, चंद्रकांत मरकड आदी वनकर्मचाऱ्यांनी या बचावकार्य व पुढील प्रक्रियेत सहभाग घेतला.

नागेश बागल यांचे दु:खद निधन



नगर - कुरुडवाडी, सोलापूर (हल्ली रा.केडगाव) येथील रहिवासी नागेश बागल (वय ६२) यांचे २० नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कुरुडवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

लोकवस्ती तसेच शाळेजवळ नियमबाह्य पोल्ट्री शेड उभारणीस ग्रामस्थांचा विरोध

तहसीलदार व ग्रामपंचायत प्रशासकाचा आदेशाही धुडकावला, २ डिसेंबरपासून आमरण उपोषण

नगर - नगर तालुक्यातील घोसपुरी येथे कोणत्याही शासकीय व पर्यावरणविषयक नियमांचे पालन न करता लोकवस्ती व जिल्हा परिषद शाळेजवळ १० हजार पक्षी क्षमतेचे पोल्ट्री शेड उभारले जात असल्याचा आरोप करत संजय उत्तम हांडोरे यांच्यासह ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. याविरोधात जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस अधीक्षक आणि घोसपुरी ग्रामपंचायत प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, मुदतीत कारवाई न झाल्यास २ डिसेंबर पासून ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



निवेदनातील माहितीनुसार, मौजे घोसपुरी येथील शेतजमीन मिळकत गट क्रमांक ८६ मध्ये दोघांकडून पोल्ट्री शेड उभारले जात आहे. हे प्रस्तावित पोल्ट्री शेड १०० ते ३०० मीटरच्या आत असलेल्या लोकवस्तीपासून तसेच २०० मीटर अंतराच्या आत असलेल्या जिल्हा परिषद शाळेपासून जवळ उभारले जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या शाळेत सुमारे ५० ते ६० विद्यार्थी शिक्षण घेत असून, पोल्ट्री व्यवसाय सुरू झाल्यास दुर्गंधी, माश्या आणि किटकांचा प्रादुर्भाव होऊन विद्यार्थ्यांचे आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

तसेच या जागेपासून जवळच विहिरी, बोअरवेल, शेततळे, ओढा, तलाव आणि नदी असे जलस्रोत तसेच शेजारील संत्रा बाग आहे. कोंबड्यांची विष्ठा, खाद्य आणि सांडपाण्यामुळे जल व जमीन प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा मुद्दा अर्जात मांडण्यात आला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जानेवारी २०२२ मधील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करता तसेच स्थानिक रहिवासी व शेजारील शेतकऱ्यांची संमती न घेता हे काम सुरु आहे. ९ ऑक्टोबर रोजी संबंधित विभागांकडे हरकत अर्ज दिल्यानंतरही काम वेगाने सुरू करण्यात आल्याचा आरोप करत संजय हांडोरे यांच्यासह विलास साळवे, मधुकर आबासाहेब शिर्के, दत्तात्रय आसाराम शिर्के, किरण साहेबराव हंडोरे, बापू निवृत्ती हंडोरे, संजय तुकाराम हंडोरे, मनोहर शंभू हंडोरे, संदीप मनोहर हंडोरे, अशोक सदाशिव हंडोरे, रोहन बापू हंडोरे, तुषार अशोक खोबरे, अशोक विठ्ठल खोबरे, बाबासाहेब आप्पा हंडोरे, जगन्नाथ शंकर हंडोरे, पोपट भगवंत हंडोरे, मधुकर भगवंत हंडोरे, यांच्यासह हंडोरे मळा व घोसपुरी ग्रामस्थांनी सह्या करून प्रशासनाकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

काम बंद करण्याचे लेखी आदेश देवूनही काम सुरूच

या संदर्भात ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासकाकडे तक्रार केल्या नंतर प्रशासकांनी १४ ऑक्टोबर रोजी स्थळ पाहणी करून संबंधितांना पोल्ट्री शेड उभारणीचे काम तात्काळ थांबविण्याचे लेखी आदेश दिले आहेत. अन्यथा आपणावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आलेला आहे. या शिवाय ३० ऑक्टोबर रोजी तहसीलदार नगर यांच्या समोर झालेल्या सुनावणीच्या वेळीही तहसीलदार यांनी सदर काम त्वरित थांबविण्याचे आदेश दिले आहेत. तरीही हे दोन्ही आदेश धुडकावून काम सुरूच असल्याचे तक्रारदार संजय हंडोरे यांनी सांगितले. तसेच तक्रार केली म्हणून संबंधितांनी हंडोरे यांना मारहाणही केली होती. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला असल्याचे हंडोरे यांनी सांगितले.

गृहिणी

आरोग्य

पावसाळ्यात असे का होते?

पावसाळ्यात हवेत जास्त आर्द्रता असते, ज्यामुळे केस घाणेरडे आणि लवकर चिकट होतात. हे टाळण्यासाठी, लोक सामान्य दिवसांपेक्षा जास्त वेळा शॅम्पू करतात, ज्यामुळे तुमच्या केसांमधील ओलावा निघून जाऊ शकतो. यामुळे केस कमकुवत होतात आणि तुटू लागतात. पावसात भिजल्यानंतर, अँटी-फंगल माइल्ड शाम्पूने तुमचे केस धुवा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा शॅम्पू करा. पावसाळ्यात केस सुकविण्यासाठी आणि स्टाईल करण्यासाठी केसांच्या साधनांचा वापर टाळा. पावसाळ्यात केस गळती रोखण्यासाठी चांगले कंडिशनर वापरा. ओले केस कंघी करू नका. केसांचा गुंता सोडवण्यासाठी रुंद दात असलेला कंगवा वापरा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा केसांना तेल लावा, यामुळे तुमचे केस पोषण आणि मजबूत होतील.

पाककला

फणसाचे लोणचे

साहित्य - ५०० ग्रॅम फणस, २५० मिली मोहरीचे तेल, चवीनुसार मीठ, १ चमचा हळद पावडर, २ चमचे लाल तिखट, २ चमचे मोहरीची डाळ, २ चमचे बडीशेप, १ चमचा मेथीचे दाणे, १/२ चमचा हिंग, २ चमचे व्हिनेगर

कृती : फणस सोलून त्याचे तुकडे करा आणि हलके उकळा आणि चांगले वाळवा. सर्व मसाले घाला आणि चांगले मिसळा. मोहरीचे तेल गरम करा आणि थंड करा आणि लोणच्यात घाला. शेवटी व्हिनेगर घाला आणि मिसळा आणि एका भांड्यात भरा आणि ३-४ दिवस उन्हात ठेवा. स्वादिष्ट फणसाचे लोणचे तयार आहे.

टिप : प्रथम फणसाचे तुकडे नीट धुवा. नंतर थोडे मीठ आणि पाणी घाला आणि स्टीमरमध्ये सुमारे १० मिनिटे शिजवा जेणेकरून ते मऊ होतील. त्यानंतर ते गाळून घ्या आणि पूर्णपणे थंड होऊ द्या. लोणच्यात ओलावा राहू नये म्हणून हे महत्वाचे आहे. मेथीचे दाणे, बडीशेप आणि मोहरी तेल न घालता पॅनमध्ये हलके तळा जेणेकरून त्यांचा सुगंध येईल. आता ते थंड करा आणि बारीक बारीक करा. आता त्यात हळद, तिखट, मीठ आणि हिंग घाला. उकडलेले सुके फणसाचे तुकडे एका मोठ्या भांड्यात ठेवा आणि त्यावर सर्व मसाले चांगले मिसळा जेणेकरून प्रत्येक तुकडा मसाल्यांनी लेपित होईल.

वास्तू

* दर शनिवारी घराच्या उंबरठ्यावर गोमूत्रामध्ये हळद कालवून त्याचा शिंपडा करावा आणि त्याचा पट्टा ओढावा.
* आंघोळ झाल्यावर रोज मुंग्यांना साखर घालावी.
* रोज वास्तू देवतेला न चुकता नैवेद्य दाखवावा.
* दर अमावस्येला तिन्ही सांजेला घरावरून दही भाताची मूद सात वेळा उतरवून रस्त्यावर टाकावी.

सल्ला

रात्री उरलेली चपाती सकाळी शिळी दुधासोबत खाल्ल्याने अपचन, गॅस, ऍसिडिटी या आजारांपासून आराम मिळतो.

सौंदर्य

पुदिन्याच्या पानांचा रस चेहऱ्यावर लावल्याने चेहरा मुलायम आणि कोमल बनतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६

प्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, अश्विनी २८।१६, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.

राशिभविष्य

मेष : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील.

वृषभ : जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

मिथुन : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

कर्क : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

सिंह : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

कन्या : आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल.

तूळ : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

वृश्चिक : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा.


धनु : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

मकर : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

कुंभ : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

मीन : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

शब्दगंध क्र. ७५६० सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) परका देश; दुसऱ्या देशी जाणे ६) वडिलोपार्जित चालत आलेली जमीन वगैरे मालमत्ता ७) जगात सर्वात जास्त पाऊस पडणारे भारतातील ठिकाण ९) कालवण वगैरे रुचकर होण्यासाठी त्याच्यात घालतात ते विविध पदार्थांचे सुवासिक मिश्रण ११) गर; मगज; खोबरे १२) दाणे ज्यात भरतात तो पिकाचा भाग; भुट्टा १४) स्वत:ला (एकवचनी) १५) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव १९) केस काळे करण्याचे रसायन २१) हार; माळ (फटाक्यांची वगैरे) २२) होण्यासारखे; जन्म; उत्पत्ती; हेतू; शक्यता २३) घोडशाळा २४) कमतरता; वानवा; कसर; उणीव २५) एक प्रकारचा झाडू

शब्दगंध क्र. ७५५९ चे उत्तर

दे	श	मु	ख	■	स	मो	र
शा	क	■	ड	ळ	म	ळी	त
ट	■	का	क	■	जू	■	■
न	म	न	■	म	त	ल	ब
■	द	ब	■	स	दा	■	ट
र	त	ला	म	■	र	ज	ब
स	नी	■	ग	बा	■	पा	टी
ना	स	■	ज	र	■	न	त

उभे शब्द :- १) कृष्णाला जन्म देणारी माता; वसुदेवाची पत्नी; कंसाची बहीण २) गप्प; सौम्य; थांबलेले; विझलेला ३) स्त्रियांचा एक दागिना ४) अटकळ; फलज्योतिषाचा एक प्रकार; अंदाज ५) एक फळ ७) शिष्य; विद्यार्थी ८) एक वाद्य जे गारुड्याजवळ असते १०) पतीचे किंवा पत्नीचे वडील १२) पूर्वी हे लोक दारू गाळत असत १३) एक छोटा भित्रा जंगली प्राणी १४) फुलातील गोड रस; मध १६) खा खा खाण्याची अनावर इच्छा १७) निरर्थक फेरी किंवा चक्कर १८) काठी; सोटा २०) आवडलेले; मान्य असलेले

***** मुलांचे विश्व *****

सुविचार : एखाद्या जवळ आपल्या अशा आठवणी ठेऊन जा, की नंतर त्याच्या जवळ आपला विषय जरी निघाला तर, त्याच्या ओठांवर थोडसं हसु आणि डोळ्यात थोडसं पाणी आले पाहिजे.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

पुरुषांनाही स्तनाचा कर्करोग होतो का?

हे खरे आहे की स्तनाचा कर्करोग सामान्यतः महिलांमध्ये आढळतो, परंतु पुरुषांनाही हा आजार होऊ शकतो. जरी तो दुर्मिळ असला तरी, पुरुषांमध्ये स्तनाचा कर्करोग एकूण प्रकरणांपैकी एक छोटासा भाग आहे. पुरुषांमध्ये या आजाराचे निदान होण्याची शक्यता जास्त असते कारण त्यांचे निदान बहुतेकदा प्रगत टप्प्यात होते (जेव्हा कर्करोग शरीराच्या इतर भागात पसरलेला असतो), तर महिलांमध्ये या आजाराचे निदान होण्याची शक्यता कमी असते. स्तनामध्ये लालसरपणा, पिंपल्स (संत्र्याच्या सालीसारखे) किंवा स्तनाच्या त्वचेचे आकुंचन हे देखील स्तनाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते. कर्करोग काखेतील लिम्फ नोड्समध्ये पसरू शकतो, ज्यामुळे तेथे गाठ किंवा सूज येऊ शकते. जरी गाठी बहुतेकदा वेदनारहित असतात, तरी काही पुरुषांना स्तनात वेदना किंवा अस्वस्थता जाणवू शकते. सर्वात सामान्य लक्षण म्हणजे गाठ सहसा वेदनारहित असते आणि स्तनाग्राजवळ जाणवू शकते. जर तुम्हाला तुमच्या स्तनात नवीन गाठ किंवा सूज दिसली तर ताबडतोब डॉक्टरांना भेट द्या. स्तनाग्रातून रक्त किंवा इतर स्त्राव, बुडलेले (उलटे) स्तनाग्र, किंवा स्तनाग्रभोवतीच्या त्वचेवर लालसरपणा, फुगवटा किंवा फोड येणे हे देखील एक धोक्याचे लक्षण असू शकते.

चतुर कबुतर

एका गुहेत, रोमक नावाचा एक कबुतर राहत होता. तो सदाचारी आणि उदार होता, तो शेकडो कबुतरांचा राजा देखील होता. तसेच त्या डोंगराजवळ एका संन्यासीची झोपडी होती. रोमक अनेकदा त्या संन्यासीला भेटायला जायचा आणि त्याच्या प्रवचनांचा आनंद घ्यायचा. एके दिवशी, संन्यासी आपली झोपडी सोडून दुसरीकडे कुठेतरी गेला. काही दिवसांनी, एक व्यक्ती एका फसव्या संन्यासीच्या वेशात त्याच झोपडीत राहायला आला. हा माणूस अनेकदा जवळच्या वस्तीत जात असे, लोकांना फसवत असे आणि त्यांच्या स्वादिष्ट जेवणाचा आस्वाद घेत आरामदायी जीवन जगत असे. एकदा, एका श्रीमंत गृहस्थांच्या घरी अन्न खाताना, तो मसालेदार कबुतराच्या मांसाने खूप मोहित झाला. त्याने स्वतःच्या झोपडीत जाऊन जवळच्या कबुतरांना पकडण्याचा आणि असाच एक पदार्थ तयार करण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर, मसाले, स्टोव्ह आणि इतर वस्तू व्यवस्थित करून आणि त्याच्या कपड्यात एक मजबूत काठी लपवून, तो झोपडीच्या दारात कबुतरांची वाट पाहत उभा राहिला. लवकरच, त्याला रोमकच्या नेतृत्वाखाली अनेक कबुतर झोपडीवरून उडताना दिसले. त्याने त्यांना खाली पाडले आणि त्यांना येण्याचे आमिष दाखवले. पण झोपडीतून येणाऱ्या मसाल्यांच्या सुगंधाने सावध झालेल्या हुशार रोमकने लगेच आपल्या मित्रांना पळून जाण्याचा आदेश दिला. कबुतरांना निसटताना पाहून त्याने रागाने रोमकवर मोठ्या ताकदीने आपली काठी फेकली, परंतु त्याचे लक्ष्य चुकले. मग रोमक ओरडला, अरे, दुष्टा! मी पळून गेलो आहे, पण तुला तुझ्या कृतींचे परिणाम भोगावे लागणार नाहीत. आता ही पवित्र झोपडी ताबडतोब सोडून कुठेतरी दूर जा, नाहीतर मी गावातील लोकांना तुझे रहस्य सांगेन. रोमकचे जोरदार शब्द ऐकून ढोंगी ताबडतोब त्याची झोपडी आणि गट्ठा घेऊन पळून गेला. तात्पर्य : नेहमी चाणाक्ष राहावे कारण संकट सांगून येत नसते.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

परंतु अकबर बादशहाचे त्या माणसाबाबत जे कुविचार होते ते संक्रमित झाले. परिणामतः त्या व्यक्तीने असेच हिंसक विचार मनात आणले. आम्ही काहीही बोललो नाही तरी आमचा क्रोध, आमचे आक्रमक हावभाव आणि रागीट आवाजांचे तरंग वातावरणात पसरतात. असा हा क्रोध फक्त त्या माणसासच प्रभावित करीत नाही तर उलट आपल्यापर्यंत संक्रमित होतो व आपल्या मनाला उद्विग्न करतो.

क्रोधाचा असाही परिणाम होतो की जेव्हा आम्ही ध्यानाभ्यासास बसतो तेव्हा त्या घटनांची आम्हाला आठवण होते. क्रोधाने भरलेल्या त्या घडामोडीचे दुसऱ्यांदा मनात स्मरण होते किंवा त्या विचारांचे वा भाषणाचे आपण चिंतन करतो. ह्या घटनांनी आम्ही सतत त्रासले जातो.

(क्रमश:)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : कधीकधी मी असा विचार करतो की, मी अडून राहावं आणि कोणासाठी काहीही करू नये. पण जेव्हा करायची वेळ येते तेव्हा मी माझाच निश्चय विसरतो.

शिवानीदीदी : या बाबतीत तुम्ही निश्चित असा पवित्रा घेऊ शकत नाही. कारण तुम्ही तुमच्या कार्मिक खात्याला बांधील आहात.तुमचं कार्मिक खातं तुम्हाला विशिष्ट परिस्थिती, नाती किंवा विशिष्ट करिअर यांच्याकडे ओढून नेईल. संपूर्ण जगाने जरी तुम्हाला थांबवण्याचा प्रयत्न केला किंवा तुम्ही जरी स्वत:ला थांबवण्याचा प्रयत्न केला तरी तुम्ही त्याच दिशेने जाल कारण तुम्ही त्या दिशेने ओढले जात आहात.समजा, मी कर्ज घेतलं आणि ते परत करायला नकार दिला तर ज्या लोकांना किंवा क्रेडिट कंपनीला मी पैसे देणं लागते ते मला सोडणार नाहीत. माझ्याकडून पैसे मिळवण्यासाठी ते हरतऱ्हेने प्रयत्न करतील.

नाती घट्ट विणू या

(क्रमश:)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

साहित्य सहवास - 'जीवनात अत्यंत महत्वाचं कोण, काय आहे ?'

स्वत:साठी वेळ काढलाच पाहिजे. सुट्टीच्या एखाद्या दिवशी स्वत:शी संवाद साधला की ' जीवनात अत्यंत महत्वाचं कोण, काय आहे?' हा प्रश्न शांतपणे, डोळे मिटवुन घेऊन, एकदा स्वत:ला विचारलाच पाहिजे. समजा मी राहातो ते ठिकाण शांत वातावरणाचे नसेल तर भल्या पहाटे उठुन अथवा ज्या ठिकाणी शांतता आहे अशा ठिकाणी जाऊन हा प्रश्न स्वत:ला विचारला तर प्रत्येकाचं उत्तर नक्कीच वेगळं असेल. एखाद्याच्या दृष्टीने आपली आई, वडिल, भाऊ, बहिण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी हे अत्यंत महत्वाचे असतील. आई, वडिलांची सेवा करणं, मुलगा, मुलगी ह्यांना शिक्षण देणं, भाऊ, बहिणीसाठी जे जे चांगलं करता येईल ते ते करणं महत्वाचं असेल. ही उत्तरं बरोबर आहेतच. पण अत्यंत महत्वाचं कोण आहे ? ह्या प्रश्नाचं उत्तर अगदी योग्य मिळत नाही तो पर्यंत हा प्रश्न स्वत:ला विचारायचा. जेव्हा हा प्रश्न मी स्वत:ला विचारला तेव्हा उत्तर मिळालं माझ्या जीवनात अत्यंत महत्वाचा आहे मी - स्वत: हेच उत्तर तुमचं मनसुध्दा देईल. समजा माझ्या जीवनात मीच अत्यंत महत्वाचा नसेल तर मग कोण अत्यंत महत्वाचं आहे ह्याचं उत्तर नेमकं योग्य काय आहे ? मीच नसेल तर मग ह्या जीवनाला अर्थच काय आहे? हे उत्तर अनेकांच्या दृष्टीने स्वार्थी असेल. पण जेव्हा तुम्ही स्वसंवाद साधतांना स्वत:शी एकरुप होता म्हणजेच तुम्ही आहात म्हणूनच स्वत:शी एकरुप होताना ? तुम्ही स्वत:च ह्या प्रश्नाचे उत्तर नसाल तर मग तुमच्या जीवनात अत्यंत महत्वाचं कोण आहे ? ह्याचं अगदी नेमकं उत्तर मिळणारच नाही.

माझ्या जीवनात अत्यंत महत्वाचं काय आहे ? ह्या प्रश्नाचं उत्तर व्यक्तीपरत्वे बदलणारच आहे. वैयक्तीक माझ्या जीवनात अत्यंत महत्वाचं काय आहे ? ह्या प्रश्नाचं उत्तर आहे माझं कुटुंब, नोकरी. कुटुंब नेहमीच मला लेखन करण्यासाठी, सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी, अनेकांसोबत प्रेरणादायी संवाद साधण्यासाठी अर्थात व्याख्यान देण्यासाठी प्रोत्साहन देत असतं. नाटक, एकांकिका, लघुचित्रपट जे मी लिहिले आहेत, भूमिका केल्या आहेत त्याविषयी मनमोकळेपणाने अभिप्राय देते. स्नेहांकित आणि स्नेहबंध परिवारातील माझे लेखन वाचुन, लघुचित्रपट पाहुन अभिप्राय देणारे काही मित्र, मैत्रिणी ह्यांचा अभिप्राय माझ्यासाठी प्रचंड उर्जादायी, आनंददायी असतो आणि आहे. समजा तुम्ही एखादी चांगली गोष्ट करत आहात त्यावेळी तुमचं मनोबल वाढवणारे मित्र, मैत्रिणी तुम्हाला सपोर्ट करत असतील, तुम्हाला प्रेरणा देत असतील तर हे नक्कीच महत्वाचं आहे. ह्यासाठी महत्वाचं आहे मनाचं मोठेपण. हे मनाचं मोठेपण प्रत्येकाजवळ नसतं. एखाद्याचं काम, तुम्ही करुन देऊ शकत असाल तर ती व्यक्ती तुम्हाला लगेच हसुन अभिप्राय देते, तुमच्या कार्याचं कौतुक करते तेव्हा तुम्हाला स्वार्थीपणा ओळखता आलाच पाहिजे. निरपेक्ष भावनेनं कार्य करणारांच्या पाठिशी उभं राहाणं ह्यासारखा आनंद नाही. हा आनंद, तुमच्या जीवनात तुम्ही मिळवणं हे अत्यंत महत्वाचं आहे. आपल्या मित्र, मैत्रिणी चांगल्या विचार, आचाराची असेल तर नक्कीच त्या मित्राचं, मैत्रिणीचं मनापासून कौतुक करा, त्याविषयी ऋण व्यक्त करा.

समजा विद्यार्थी असेल तर त्याच्यादृष्टीने अभ्यास, परिक्षा, क्लासेस हे महत्वाचं आहे. एखादा व्यावसायिक असेल तर त्याच्यादृष्टीने त्याचा व्यवसाय, ग्राहक हे महत्वाचे आहेत. आपला अन्नदाता शेतकरीदादाच्या दृष्टीने आपली काळी आई (शेती) अत्यंत महत्वाची आहे, पाऊस अत्यंत महत्वाचा आहे. एखादा कलाकार असेल तर त्याच्यातली कला अत्यंत महत्वाची आहे. व्यक्तीपरत्वे 'जीवनात अत्यंत महत्वाचं काय आहे?' ह्या प्रश्नाचं उत्तर बदलतं. मनुष्यजन्म अमुल्य आहे, एकदाच मिळणारा आहे. ह्या जीवनाचा प्रवास अत्यंत विचारपूर्वक करणं महत्वाचं आहे. स्वत:शी प्रामाणिक राहाणं, नोकरी करत असेल तर स्वत:च्या टेबलाशी प्रामाणिक राहाणं, आत्मविश्वास - जिद्दीने ध्येयाकडे चालणं, परिश्रम करण्याची तयारी ठेवणं, लुबाडण्याचं काम न करता आपल्या घासातला घास गरजुला देणं, चांगला विचार आणि त्यानुसार चांगलं वागणाऱ्यांच्या सोबत असणं, स्वत:ची आवड - छंद जोपासणं, माझ्यामुळे इतरांचं नुकसान होणार नाही अथवा इतरांना त्रास होणार नाही अशी कृती करणं, समाज विधायक उपक्रम राबवणं... आणखीही बरंच काही आपण करु शकतो, केलंच पाहिजे, ह्यासाठी 'मी' स्वत: अत्यंत महत्वाचा आहे. ह्यामध्ये 'मी' हा मीपणाचा गर्विष्ठ ह्या अर्थाने नाहीय तर मी, ह्या मनुष्य जीवनात काय काय चांगल असं करु शकतो हे दाखवणारा आहे. मी स्वत: जर अत्यंत महत्वाचा नसेल तर एकदा संपूर्ण दिवसभर फक्त आराम करा. मग माझ्या जीवनात अत्यंत महत्वाचं कोण काय आहे ? ह्या प्रश्नाचं उत्तर न शोधताही मिळेल. स्वत:ची काळजी घेऊया. स्वत:सह इतरांना योग्य मार्गावर घेऊन चलुया. स्वार्थाऐवजी निरपेक्ष भावनेनं एकमेकांसाठी चांगलं असं करुया. माज्या स्वत:मधील चांगल्या अर्थाने बदल हा माझ्यासह अनेकांचं भविष्य उज्वल करणारं असणार आहे.

(लेख क्र.६२५)

- सुनील राऊत माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

हसा आणि शतायुषी व्हा!

पप्पा : बेटा, कुठे आहेस? घरी ये. तुला बाईक घ्यायला जायचं आहे ना!

मम्मी : बेटा, घरी जेवायला ये लवकर. तुझ्या आवडीची भाजी केलीय.

बहीण : दादा, घरी येऊ नकोस. तुझ्या खिशात सिगारेट सापडली आहे!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारत सरकारच्या कोणत्या मंत्रालयाने जागतिक सूर्यनमस्कार कार्यक्रमाचे आयोजन केले होते? - आयुष मंत्रालय

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

२) श्वेत व कृष्णसारिवा : यामुळे गर्भाची वाढ चांगल्या रीतीने होऊन गर्भपात होत नाही. तसेच गर्भाची वार देखील मजबूत तयार होते; त्यामुळे वार गर्भाशयाच्या भिंतीपासून सुटून जो गर्भपात होतो, तो होत नाही.चौथा महिना : या महिन्यामध्ये गर्भाचे अवयव स्पष्ट दिसू लागतात. तसेच गर्भाचे स्रोतसे दिसतात.

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

१) सारिवा : यामुळे गर्भाची स्रोतसे चांगली तयार होण्यास मदत होते.

२) यष्टीमधु : ज्येष्ठमध गर्भवतीला व गर्भाला पोषक व बल्य असते.

(क्रमश:)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

कॉम्रेड डॉ. अजित नवले यांचा २२ नोव्हेंबरला 'स्वराज्यसेनानी' लोकगौरवाने होणार सन्मान



नगर – ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यसेनानींच्या त्याग आणि संघर्षाचा इतिहास देशाच्या अभिमानाचा विषय आहे. मात्र, १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही सर्वसामान्य नागरिकांना संविधानाने दिलेले अधिकार, सामाजिक न्याय आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संघर्षाची गरज कायम आहे. लोकशाही मूल्यांचे रक्षण, संविधानाची अंमलबजावणी तसेच शेतकरी, आदिवासी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या आधुनिक काळातील लढवय्यांना स्वतंत्र ओळख आणि राष्ट्रीय प्रतिष्ठा मिळावी, या उद्देशाने 'स्वराज्यसेनानी' ही अभिनव लोकसन्मान संकल्पना पुढे आणण्यात आली आहे.

पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने या संकल्पनेअंतर्गत शेतकरी व आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे कॉम्रेड डॉ. अजित नवले यांना 'स्वराज्यसेनानी' या किताबाने गौरविण्यात येणार आहे. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगर येथील ऐतिहासिक हुतात्मा स्मारकात हा लोकगौरव सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय सत्तेविरुद्ध लढा देणाऱ्या क्रांतिकारकांना आणि देशभक्तांना 'स्वातंत्र्यसेनानी' म्हणून ओळखले जाते. त्याच धर्तीवर स्वातंत्र्यानंतर देशात खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्था रुजविण्यासाठी, संविधानातील मूलभूत अधिकार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या व्यक्तींना 'स्वराज्यसेनानी' म्हणून ओळख मिळावी, अशी या संकल्पनेची भूमिका आहे.

स्वराज्य म्हणजे केवळ राजकीय सत्तांतर नव्हे, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि सन्मान पोहोचणे होय. शेतकरी, आदिवासी, शेतमजूर, महिला आणि वंचित घटकांना संविधानाने दिलेले अधिकार प्रत्यक्षात मिळावेत, शासनव्यवस्था ही मूठभरांच्या हिताऐवजी सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्यरत राहावी, यासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव करणे आवश्यक आहे. याच विचारातून 'स्वराज्यसेनानी' या लोकसन्मानाची निर्मिती करण्यात आली आहे.

डॉ. अजित नवले यांनी शेतकरी चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कष्टकरी कुटुंबांना न्याय मिळावा, त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळावा आणि शेती क्षेत्रातील प्रश्नांची प्रभावी सोडवणूक व्हावी, यासाठी त्यांनी विविध आंदोलनांच्या माध्यमातून संघर्ष केला आहे. यासोबतच पिढ्यान्पिढ्या वनजमिनीवर उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाव्यात, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि आदिवासी समाजाला न्याय व सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठीही त्यांनी लढा उभारला आहे. वंचित आणि कष्टकरी घटकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची त्यांची भूमिका लक्षात घेऊन पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेने त्यांची 'स्वराज्यसेनानी' या सन्मानासाठी निवड केली आहे.

'स्वराज्यसेनानी' ही संकल्पना केवळ आंदोलन किंवा संघर्षापुरती मर्यादित नसून ती समाजपरिवर्तनाच्या व्यापक विचाराशी जोडलेली आहे. लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती यांसोबतच संविधानिक नैतिकता आणि कायद्याचे राज्य या मूल्यांना या चळवळीचा आधार मानण्यात आला आहे. निःस्वार्थ सार्वजनिक कार्य, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्यांचे संवर्धन आणि निसर्गाचे संरक्षण यांसाठी काम करणाऱ्या प्रत्येक कृतिशील नागरिकाला या संकल्पनेतून प्रेरणा आणि नवी ओळख मिळावी, हा आयोजकांचा प्रयत्न आहे.

स्वातंत्र्यसेनानींनी देशाला परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त केले, तर स्वराज्यसेनानींनी त्या स्वातंत्र्याचे लोककल्याणकारी व्यवस्थेत रूपांतर करण्यासाठी संघर्ष करावा, अशी या उपक्रमामागील मध्यवर्ती भूमिका आहे.

या सोहळ्यात डॉ. अजित नवले यांना 'स्वराज्यसेनानी' हा लोकगौरव प्रदान करण्यात येणार असून, शेतकरी, आदिवासी, कष्टकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि संविधानप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या सन्मान सोहळ्यासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले आदी प्रयत्नशील आहेत.

प्रेरणादायी अक्षरधन

मी आणि माझे हे दुःखाचे ओझे





एकाने एक सोनेरी चौकटीचे घड्याळ विकत आणले. डोळ्याला सुखावणारे रंग आणि आकड्यांचा ढंग अनोखाच होता. वाटावे, पाहतच राहावे. प्रत्येक तासाला कोंबडा बाहेर यायचा. कुकूचकू करून वेळेच भान आणून द्यायचा. ते भिंतीवर असे टांगले की, घरातल्यांना पाहणे जड गेले. मान वाकडी करून डोळे वर केल्याशिवाय ते सहज दिसेना. शेजाऱ्यांनी मात्र त्यांच्या खिडकीतून नजर टाकली की ती घड्याळावरच पडायची. जणू शेजाऱ्यांसाठीच घेतले ते घड्याळ. विचारले तर उत्तर आले, होय, शेजाऱ्यांसाठीच घेतलंय. त्यांच्याकडे कुठंय असं मोहक, कोंबडेवालं घड्याळ शेजाऱ्याला हिणवणे, स्वतःचा अहंकार कुरवाळणे.

शेजारीही विचित्रच. तिसऱ्याच दिवशी त्यांनी ती खिडकी बंद केली. डोळ्यांना सुखावणारं घड्याळ पाहावले नाही त्यांना ? सोनेरी तबकडी आणि ठुमकत बाहेर येणारा कोंबडा त्यांना आनंद देत नव्हता? खिडकी स्वत:हून बंद करून आपल्या आनंदाचं आगमन त्यांनी स्वतःच का रोखलं ? त्या घड्याळाच मालक मी नाही, म्हणून. ते घड्याळ माझ्या मालकीचे नाही म्हणून मी आणि माझे, म्हणजे पाठीवर दुःखाचे ओझेच, आद्य शंकराचार्य म्हणतात,

जगात तेच लोक आनंदाने धनी होतात, की जे मी आणि माझे या संकुचित संकल्पनेचे ओझे फेकून देतात. मान, अपमान या क्षुद्र भावना न शिवो कधी मना. शत्रू आणि शेजारी माझ्या सुखात समान वाटेकरी. मी भिंतीवर घड्याळ लावले ते शेजाऱ्याला वेळ पाहता यावी म्हणूनच. भावना ही एकच की मी जे कर्म करतो. त्याचे फळ इतरांना अर्पितो. मग मी सुखाचा धनी होतो. हाच सफल जीवनाचा मार्ग ठरतो.

पुढे काय पाहा. शेजाऱ्याचे घड्याळ बिघडले. वेळ कळणे जड गेले. हळूच खिडकी उघडली. सोनेरी तबकडीचे घड्याळ पाहायला सुरुवात केली. दोन तीन दिवस त्यांनी सतत खिडकीशी उभे राहून वेळ पाहिली. इकडे भिंतीवरच्या घड्याळाची जागा त्वरित बदलली. शेजाऱ्यांना आता वेळ कळेनाशी झाली. हे घड्याळ माझं आहे. शेजाऱ्याला त्याचा फायदा का व्हावा? माझ्या खर्चानं त्याची सोय का व्हावी, असे घड्याळाच्या मालकाला वाटले.

पण ते घड्याळ दुसरीकडे लावले आणि नसते दुःख पदरी पाडून घेतले. जेथे घड्याळ लावले, ती भिंत भुसभुशीत होती. घड्याळ अडकविले होते तो खिळा ढिला झाला. एके रात्री घड्याळ जमिनीवर आदळले. कोंबड्याची मान मोडली. मी आणि माझे ही भावना नुकसान करून गेली. वर पुन्हा शेजाऱ्यालाच वेळ विचारण्याची अपमानकारक वेळ आली.

– किशोर गांधी

सद्गुरू श्री शंकर महाराज प्रकट दिन साजरा; दिनदर्शिका व दत्त जयंती महोत्सव पत्रिकेचे प्रकाशन



श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट, दत्त कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर यांच्या वतीने सद्गुरू श्री शंकर महाराज यांचा प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी दिनदर्शिका व दत्त जयंती महोत्सव पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

नगर – श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट, दत्त कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर यांच्या वतीने सद्गुरू श्री शंकर महाराज यांचा प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी विधिवत रुद्राभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी १११ दत्तभक्तांनी श्रद्धापूर्वक शंकर गीता पारायण केले. त्यानंतर सद्गुरू श्री शंकर महाराज यांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. भक्तांच्या सहभागाने परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने आगामी दत्त जयंती उत्सव २०२६ (२४ वे वर्ष) तसेच धार्मिक व सामाजिक उपक्रमांची माहिती देणाऱ्या महोत्सव पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच सन २०२७ च्या दिनदर्शिकेचेही प्रकाशन करण्यात आले. धार्मिक परंपरा जपत सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचा ट्रस्टचा प्रयत्न या आयोजनातून दिसून येत आहे.

यंदाच्या दत्त जयंती महोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर, सामूहिक हनुमान चालीसा पठण, गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, ह. भ. प. भोगडे महाराज यांचे प्रवचन, रुद्राभिषेक, होमहवन, श्री दत्तप्रभूंची पालखी मिरवणूक आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सुमारे पाच ते सहा हजार भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत गरजू व्यक्तींना मदतीचा हात देण्याचा संकल्प या उत्सवाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

दत्त जयंती महोत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून भक्ती, सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम आहे. लोकसहभागातून साकारत असलेल्या या महोत्सवात भाविकांच्या सहकार्याला विशेष महत्त्व आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, रक्तदान शिबिर यांसारखे सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक सहकार्याची आवश्यकता आहे. त्यामुळे दानशूर व्यक्ती, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि दत्तभक्तांनी या धर्मकार्यामध्ये सहभागी होऊन सढळ हाताने देणगी द्यावी, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

ट्रस्टचे प्रमुख सदस्य श्री. दीपक गुंडू यांनी दत्तभक्तांना उत्सवाच्या आयोजनासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार दिलेले योगदान महोत्सवाच्या आयोजनाला बळ देणारे ठरणार असून, भक्तांच्या सहकार्याने धार्मिक आणि सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविता येणार आहेत.





शहरातील सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला.

राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सवाचा भक्तिमय सोहळा

नैवेद्याने मंदिर सजले; भजन-कीर्तनातून भक्तिरसाची अनुभूती

नगर – शहरातील सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. भगवान श्रीकृष्णाला विविध प्रकारच्या मिठाई, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थांचा छप्पन भोग अर्पण करून महाआरती करण्यात आली. या धार्मिक सोहळ्याला शीख व पंजाबी समाजातील भाविकांसह महिला आणि शहरातील नागरिकांनी उपस्थित राहून दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.

उत्सवाच्या प्रारंभी मंदिर परिसरात भजन-कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम रंगला. गायक गिरीराज जाधव यांनी विविध भक्तिगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांना भक्तिरसात तल्लीन केले. राम राम सीताराम..., देना हो तो दीजिये जन्म जन्म का साथ... महाकाल सरकार मेरे... यांसारख्या भक्तिगीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. तर ओ पालनहारे... या गीताच्या सादरीकरणाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला. भगवान श्रीकृष्णाच्या गीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. उपस्थित महिला आणि भाविकांनीही भक्तिगीतांचा मनमुराद आनंद घेतला.

पदार्थांची आकर्षक पद्धतीने मांडणी

दरवर्षी गोवर्धन पूजेनंतर राधा-कृष्ण मंदिरात अन्नकोट महोत्सवाचे आयोजन करण्याची परंपरा आहे. यंदाही या परंपरेचे पालन करत भाविकांनी विविध प्रकारचे गोड पदार्थ, मिठाई, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थ मंदिरात आणले होते. या सर्व पदार्थांची आकर्षक पद्धतीने मांडणी करून भगवान श्रीकृष्णासाठी छप्पन भोगाचा नैवेद्य तयार करण्यात आला. भक्तांनी श्रद्धापूर्वक अर्पण केलेल्या या नैवेद्यामुळे मंदिरातील वातावरण अधिकच प्रसन्न आणि मंगलमय झाले होते.

भगवान श्रीकृष्णाची विधिवत महाआरती

यानंतर पंजाबी सनातन धर्मसभेचे ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, विश्वस्त मंडळातील सदस्य आणि प्रमुखांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाची विधिवत महाआरती करण्यात आली. आरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. आरतीनंतर सर्व भाविकांना महाप्रसाद (लंगर) आणि प्रसादाचे वाटप करण्यात आले. या अन्नकोट महोत्सवात विविध समाजघटकांतील भाविकांनी सहभाग नोंदविला. भजन-कीर्तन, छप्पन भोगाचा नैवेद्य, महाआरती आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी सर्जेपुरा येथील राधा-कृष्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

देव दिवाळीनिमित्त २४ नोव्हेंबर रोजी नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व दिपोत्सव



नगर – येथील श्रीराम मंदिरात देव दिवाळीनिमित्त २४ नोव्हेंबर रोजी आकर्षक विद्युत रोषणाई व दिपोत्सव करण्यात येणार असून या देव दिवाळीनिमित्त हजारो दीप प्रज्वलित करण्यात येणार असल्याची माहिती श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने सांगण्यात आले. तसेच १६ नोव्हेंबर रोजी श्रीराम मंदिरात अन्नकूट (छप्पनभोग) व भजन संध्या मंदिरात सर्व भक्तां समवेत साजरा करण्यात आला व २००० भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला अशी माहिती ट्रस्ट चे अध्यक्ष प्रितम मुथ्था यांच्या वतीने देण्यांत आली

नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने वर्षभरात विविध कार्यक्रम साजरे करण्यात येतात तसेच दर शनिवारी भक्तिभावाने रात्री ८ वाजता हनुमान चालीसा पठण व भजन संध्या व महाप्रसाद आयोजन करण्यात येते गेल्या १८वर्षापासून अविरतपणे ट्रस्टच्या माध्यमातून अनेक धार्मिक उत्सव या मंदिरामध्ये साजरा होत आहेत.

देव दिवाळीनिमित्त अयोध्या च्या धर्तीवर श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट च्या वतीने श्रीराम मंदिरास आकर्षक अशी विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली तसेच २४ नोव्हेंबर रोजी हजारो दिव्यांनी दीप प्रज्वलित करून आकर्षक दिपोत्सव सजावट करण्यात येणार आहे. या उत्सवात नगर शहरातील भावीक भक्तांनी दर्शनासाठी उपस्थित राहावे असे श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट चे उपाध्यक्ष निखिल शेटिया यांनी आवाहन करण्यात आले आहे.



हभप समाधान महाराज शर्मा यांनी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरास भेट देऊन आरती केली. यावेळी देवस्थानच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

हभप समाधान महाराज शर्मा यांची श्री विशाल गणेश मंदिरास भेट

नगर – शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरास हभप समाधान महाराज शर्मा यांनी भेट देत महापूजा करून आरती केली. यावेळी महंत संगमनाथ महाराज, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, चंद्रकांत फुलारी, प्रा. माणिकराव विधाते, नितीन पुंड, हभप अमित महाराज धाडगे, राजू एकाडे आदी उपस्थित होते.

यावेळी हभप समाधान महाराज शर्मा यांनी मंदिर परिसराची पाहणी करून गणेश मूर्तीची प्रशंसा केली. त्यांनी मंदिराविषयी माहिती उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे यांच्याकडून जाणून घेतली. तसेच देवस्थानच्या वतीने हभप समाधान महाराज शर्मा यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन नितीन पुंड तर, प्रास्तविक सचिव अशोकराव कानडे यांनी केले. प्रा. माणिकराव विधाते यांनी आभार मानले.

पारधी समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन

६७ लाभार्थ्यांना मंजुरी मिळूनही वाटप नाही; टपरी योजनेसह प्रलंबित निधी तातडीने वितरित करण्याची मागणी



नगर – आदिवासी पारधी समाजातील लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या शेळीपालन योजनेचे अद्याप वाटप करण्यात आलेले नाही. तसेच विविध शासकीय योजनांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याने पारधी विकास कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध करीत प्रलंबित योजनांचा लाभ तातडीने देण्याची मागणी करण्यात आली.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या माध्यमातून पारधी समाजातील ६७ लाभार्थ्यांना शेळीपालनासाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चिठ्ठी पद्धतीने या ६७ लाभार्थ्यांची निवडही करण्यात आली होती. मात्र, मंजुरी मिळून चार ते पाच महिने उलटूनही संबंधित लाभार्थ्यांना अद्याप शेळीपालन योजनेचा लाभ मिळालेला नाही. आदिवासी विकास प्रकल्प तसेच जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे गरीब पारधी कुटुंबांची पिळवणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित कार्यालयांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन राजूर प्रकल्प आणि जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून चौकशी करावी व लाभार्थ्यांना त्यांचा हक्काचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते अरुण जाधव यांनी केली. याशिवाय राजूर प्रकल्पांतर्गत ८१ लाख रुपयांच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या टपरी योजनेसाठी लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर केले असून ते तातडीने मंजूर करून योजनेचा लाभ वितरित करावा. तसेच प्रकल्पाकडे शिल्लक असलेल्या ६० लाख रुपयांच्या निधीतून शेळीपालन योजनेपासून वंचित राहिलेल्या दिव्यांग व्यक्ती व एकल महिलांचे प्रलंबित प्रस्ताव मंजूर करावेत, अशीही मागणी करण्यात आली.

या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव यांच्यासह पारधी विकास कृती समितीचे विशाल पवार, तुकाराम पवार, सोनम धीवर, राहुल पवार, अतिश पवार, शितल काळे, डीसेना पवार, संगीता काळे, त्रिषाली काळे, जिदेभान काळे, सत्यवान काळे, पिंटू काळे, सुरज भोसले, ओपन काळे, शोभा काळे, सकपाल भोसले, प्रशांत भोसले, संगीता भोसले, सुकेश भोसले, परिवार भोसले, शंकर भोसले, पार्लेजी भोसले, मंदाकिनी चव्हाण, आसराबाई काळे, मयुरी भोसले, काझी काळे, बिंदिया भोसले, राजश्री भोसले, ऋतुजा भोसले, गौतम काळे, काजोरी पवार, उर्मिला कावडे, मीनाक्षी पवार यांच्यासह पारधी समाजातील महिला व पुरुष उपस्थित होते.

कॉर्फ बॉल लीगमध्ये अहिल्यानगरच्या दिशान गांधी याचे दैदिप्यमान यश

निलाई, मलेशिया येथे डिसेंबरच्या प्रारंभी होणाऱ्या आशिया ओशियाना चॅम्पियन्शिप स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान किशोर गांधी रोहटक येथे भारतीय संघातर्फे खेळण्यास आज रवाना होत आहे. त्यानिमित्त त्याचा क्रीडा प्रवास सांगितलाय माजी क्रीडा अधिकारी व खो-खो पटू सुधीर चपळगावकर यांनी...

मागील काही दिवसात क्रीडा क्षेत्रासाठी कॉर्फ बॉल खेळासाठी एक अत्यंत सुखद व आनंदादायक बातमी आली. पहिली कॉर्फ बॉल प्रीमीयर लीग स्पर्धा डेहराडून व दिल्ली या ठिकाणी संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये देश विदेशातील ८ कॉर्फ बॉल संघांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये दिल्ली धुरंधर संघाने विजेतेपद पटकाविले. विजेत्या दिल्ली धुरंधर संघात आपल्या अहिल्यानगरचा आंतरराष्ट्रीय कॉर्फ बॉल खेळाडू दिशान किशोर गांधी याचा समावेश होता. बास्केटबॉल सारखा असणारा हा खेळ आता भारतात लोकप्रिय होत आहे ही मोठी जमेची बाब म्हणावी लागेल. कॉर्फ बॉल हा खेळ दम, ताकद, डावपेच आणि विरोधी संघातील कच्चे दुवे ओळखून खेळावा लागतो.

दिल्लीतील त्यागराज इनडोअर स्टेडीयममध्ये पहिली वहिली कॉर्फ बॉल लीग स्पर्धा भारतात आयोजित करण्यात आली होती. १६ दिवस चाललेल्या या स्पर्धेमध्ये ८ संघांनी सहभाग नोंदविला होता व सुमारे १५० खेळाडूंनी यामध्ये सहभाग घेतला होता.



दिशान गेल्या १० वर्षापासून या खेळाचा सराव करीत असून त्याने देशविदेशातील अनेक स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मलेशीया, थायलंड या देशांमध्ये भारतीय संघातून सहभाग घेऊन त्याने सर्वोत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केलेले आहे याचा उपयोग कॉर्फ बॉल लीगमध्ये होण्यासाठी त्याला झाला असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. या प्रिमीयर लीगमध्ये अनेक देशातील आणि विदेशातील पुरुष व महिला कॉर्फ बॉल पटूंनी सहभाग नोंदविला होता. चांगला उंचापुरा असणारा दिशान मैदानावर उतरल्यावर चित्त्याच्या चपळाईने चेंडूचा ताबा घेऊन संघ सहकाऱ्यांसह बास्केट करीत असतानाचे चित्र मॅचेसमध्ये अनेक वेळा दिसून आले.

कॉर्फ बॉल लीगचा अंतिम सामना दिल्ली धुरंधर विरुध्द झाला. या सामन्यात विजेत्या दिल्ली धुरंधर संघाने बहारदार खेळाचे प्रदर्शन करताना त्यामध्ये दिशानच्या बचावाने अनेक बास्केट होण्यापासून संघाचा बचाव झाल्याने त्यामध्ये संघास मोठ्या गुणांनी विजेतेपदाची माळ गळ्यात पडली. त्या आधी देखील दिल्ली धुरंधर संघाने जोरदार कामगिरी करताना त्यांच्या लीगमध्ये सर्वच्या सर्व ७ सामने सलगरीत्या जिंकत अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

या स्पर्धेतील सामन्यांमध्ये दिशान याने उत्कृष्ट संरक्षण व आक्रमण असा संमिश्र खेळ करीत संघ, प्रेक्षक, समीक्षक, आणि पदाधिकारी यांचे मने जिंकली. अंतिम सामन्यात दिशानने बचावाचे प्रदर्शन करुन संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. संघाच्या संरक्षणासाठी दिशान हा अभेद्य भींतीप्रमाणे उभे राहिल्यामुळे त्याचा बचाव भेदणे विरोधी संघाला अतिशय कठीण होत होते.

दिशानला कॉर्फ बॉलचे बाळकडू व मार्गदर्शन पेमराज सारडा कॉलेजमध्ये प्रा. संजय धोपावकर यांच्याकडून लाभले. त्या खेळाची गोडी लावताना त्याला चांगले मार्गदर्शन संजय सरांनी केले व त्याच्याकडून सराव करुन घेतला त्याचेच फळ म्हणून त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळाली व प्रीमीयर लीगमध्ये विजेतेपद मिळवून संघाला ३१ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळवण्यात यश मिळाले.

दिशानचे वडील किशोर गांधी हे उत्कृष्ट क्रिकेटपटू असून लहानपणापासूनच त्यांनी दिशानला मैदानी खेळांची गोडी लावली, तसेच आई सौ. बबीता किशोर गांधी यांनी दिशानच्या आहार विहाराची योग्य ती काळजी घेताना त्याला पूरक अशी भुमिका निभावली. त्याच्या या यशामध्ये वडील किशोर व आई बबीता यांचा मोलाचा वाटा आहे हे आवर्जून नमुद करावेसे वाटते.

अहिल्यानगर जिल्हा कॉर्फ बॉल असोसिएशनचे अध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, कार्याध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरीया, सचिव किशोर गांधी, पदाधिकारी डॉ. सौ. सुधा कांकरीया, वसंतशेठ लोढा – संस्थापक अध्यक्ष पं. दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक सुधीर चपळगावकर, प्रा. संजय धोपावकर यांनी दिशानच्या या कामगिरीचे कौतुक व अभिनंदन करुन भविष्यात जागतिक व ऑलिंपीक स्पर्धामध्ये देखील तो अहिल्यानगरचे नाव मोठे करेल अशा शुभेच्छा सर्वांनी दिल्या आहेत. त्याचे सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे.

दिशान भविष्यात देखील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करुन पदके प्राप्त करील व अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव जगात उंचावेल अशी सदीच्छा व आशिर्वाद व्यक्त करतो.

– सुधीर मुरलीधर चपळगावकर
सेवानिवृत्त तालुका क्रीडा अधिकारी,
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,
अहिल्यानगर

अहिल्यानगरमध्ये २२ नोव्हेंबर रोजी 'गोकुळ सूर्यनामा' आंदोलन छेडणार

नगर– कोल्हापूरच्या ऐतिहासिक गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रस्थापित व्यवस्थेने खेळलेला सत्तेचा खेळ हा केवळ एका सहकारी संस्थेचा ताबा मिळवण्याचा वाद नाही; तर तो तळागाळातील उत्पादक सभासदांच्या सामूहिक कौलाचा आणि लोकशाहीच्या आत्म्याचा केलेला अपमान आहे. या लोकशाही-विरोधी कारभाराविरुद्ध पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने कुमन धारणालयाचा गोकुळ सूर्यनामा हे धडक लोकशाही अब्रु रक्षण आंदोलन छेडण्यात आले आहे. हे आंदोलन २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगरच्या हुतात्मा स्मारकात पार पडेल. पूर्वी हे आंदोलन १५ नोव्हेंबर रोजी ठरले होते; परंतु दिवाळीच्या काळात माहेरी आलेल्या बहिणींचा स्नेहमिलन सोहळा आणि कौटुंबिक सामाजिक बंधांचा मान राखून आयोजकांनी यात कालसुसंगत बदल केला आहे.

गोकुळच्या संचालक मंडळ निवडणुकीत आमदार सतेज पाटील यांच्या आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकत स्पष्ट बहुमत सिद्ध केले होते. परंतु, लोकशाहीच्या संख्याशास्त्राला बगल देणारा घटनाक्रम नंतर घडला. तहकूब बैठक व अध्यादेशाद्वारे २९ ऑक्टोबर रोजी बोलावलेली पहिली बैठक गणपूर्ती न झाल्याने तहकूब झाली. त्यानंतर ६ नोव्हेंबर रोजी एका विशेष अध्यादेशाद्वारे चार शासननियुक्त संचालकांना अचानक मताधिकार बहाल करण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयाने ९ नोव्हेंबर रोजी या अध्यादेशाला अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला असला, तरी अंतिम निकाल याचिकेच्या अधीन राहील, असे स्पष्ट केले आहे.

परंतु, कायदेशीर कायदेशीरपणाच्या कागदामागे नैतिकतेचा गड कसा ढासळतो, हा खरा प्रश्न आहे. निकाल लागल्यानंतर आणि अध्यक्षपदाची निवडणूक अवघ्या काही तासांवर असताना मताधिकाराचे नियम बदलणे, हे बहुमत असलेल्या आघाडीचा विजय निष्प्रभ करण्याचे सुनियोजित तंत्र होते. यामुळे सहकारी लोकशाहीत सभासदांच्या खऱ्याखुऱ्या कौलाचे रक्षण कसे करायचे, असा गंभीर प्रश्न आज देशासमोर उभा ठाकला आहे. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा स्वतःभोवती केंद्रित करण्याच्या प्रवृत्तीला संघटनांनी कुमन धारणालय असे समर्पक नाव दिले आहे. अशा धारणालयातून जन्माला येणारी ब्युरोकॉन्शिओ (नौकरशाहीयुक्त) शासनव्यवस्था ही नेहमीच निसर्ग, मानवसमाज आणि तळागाळातील घटकांच्या हिताला दुय्यम स्थान देऊन केवळ केंद्राभिमुख राहते.

याच विकृत प्रशासनिक संस्कृतीचा निषेध म्हणून सूर्यनाम्यात महाराष्ट्राच्या मंत्रालयाचे प्रतीकात्मक नामांतर शकुनी तंत्रालय असे केले जाणार आहे. तिरंग्याच्या साहाय्याने लोकशाहीची लाज झाकण्याची प्रतीकात्मक कृती करून, सभासदांच्या पवित्र कौलाची थट्टा थांबवण्याचा संदेश दिला जाईल. 'तिरंगा राष्ट्रीय धारणालय' या संकल्पनेच्या आधारावर लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, घटनात्मक नैतिकता आणि कायद्याचे राज्य या चिरंतन मूल्यांची जपणूक करण्याची ही निडर हाक आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

चांगले खेळाडू घडण्यासाठी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन होणे गरजेचे

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर – नगर जिल्हा हा क्रीडाप्रेमी जिल्हा असून, विविध क्रीडा प्रकारांतून चांगले खेळाडू घडत आहेत. या खेळाडूंचा आदर्श इतरांनीही घ्यावा, यासाठी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन होणे गरजेचे आहे. स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडू खऱ्या अर्थाने घडत असतात. मैदानावर खेळण्यासाठी येणाऱ्या खेळाडूंमध्ये ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण होते. त्यातून खेळाविषयी आवड निर्माण होऊन नव्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळते, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि अहमदनगर जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली एकलव्य क्रीडा मंडळ, निर्मलनगर यांच्या वतीने ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेसाठी उभारण्यात येणाऱ्या माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरी मैदानाचे भूमिपूजन आ. जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.



महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि अहमदनगर जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली एकलव्य क्रीडा मंडळ, निर्मलनगर यांच्या वतीने ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले असून या स्पर्धेसाठी उभारण्यात येणाऱ्या माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरी मैदानाचे भूमिपूजन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक निखिल वारे, निर्मलचंद्र थोरात, प्राध्यापक सुनील जाधव, ज्ञानेश्वर काळे, प्राचार्य बाळासाहेब सागडे, नगरसेवक महेश लोंढे, अभिजित बोरुडे, सुधाकर सुंबे, बाळासाहेब पवार यांच्यासह खेळाडू उपस्थित होते. खो-खो हा पारंपरिक मैदानी खेळ असून, राज्यस्तरीय स्पर्धेच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंना राज्यभरातील उत्कृष्ट खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आ. जगताप यांनी केले.

यावेळी निर्मलचंद्र थोरात म्हणाले की, सुमारे ४० वर्षांनंतर पुन्हा एकदा अहिल्यानगर शहरात या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन होत आहे. या स्पर्धेत राज्यातील पुरुषांचे २४ आणि महिलांचे २४ असे एकूण ४८ संघ सहभागी होणार आहेत. सुमारे ७५० खेळाडूंसह प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, पंच, तांत्रिक समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र खो-खो संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे शहरात खो-खो खेळाचा मोठा क्रीडामहोत्सव अनुभवायला मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रात्री विद्युत रोषणाईमध्ये सामने

नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या मैदानावरील खो-खो स्पर्धेच्या मैदानाला माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरी असे नाव देण्यात आले आहे. या ठिकाणी चार स्वतंत्र मैदाने तयार करण्यात येणार असून, दिवसा तसेच रात्री विद्युत रोषणाईमध्ये सामने खेळविण्यात येतील. प्रेक्षकांसाठी तीन ते चार हजार आसनक्षमतेची गॅलरी उभारण्यात येणार आहे. स्पर्धेतील सामन्यांचे आकाशवाणी, यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम तसेच अन्य सोशल मीडिया माध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित राहू न शकणाऱ्या क्रीडाप्रेमींनाही सामन्यांचा आनंद घेता येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

जागतिक पुरूष दिनानिमित्त २२ नोव्हेंबरला 'पुरूषांमधील अँड्रोपॉज' विषयावर व्याख्यान

बिबिएन वेलफेअर असोसिएशनचा उपक्रम

नगर – १९ नोव्हेंबर हा जागतिक पुरुष दिनानिमित्त पुरुषांमधील ४०-६० या वयात होणारे बदल आणि त्याअनुषंगाने स्वभावातील बदल या विषयावर ब्राह्मण बिझनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशनतर्फे विशेष व्याख्यानाचे आयोजन २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०-१२ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. आयुर्वेद तज्ञ डॉ. महेश मुळे व्याख्यान देणार असून हा कार्यक्रम समाजातील सर्वांसाठी खुला असून यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष चिन्मय सुखटणकर यांनी आहे.

संस्थेचे सचिव निखिल कुलकर्णी यांनी सांगितले की, स्त्रियांच्या Menopause विषयी नेहमी बोलले जाते. त्या काळामध्ये स्त्रियांची काळजी कशी घ्यावी, त्यांना कोणते शारीरिक व मानसिक आजार होतात यावर खूप साहित्य उपलब्ध आहे, खूप वेगवेगळ्या स्तरांवरून या विषयी बोलले जाते परंतु त्याचबरोबर पुरुषांना देखील Andropause असते. त्यामध्ये देखील काही शारीरिक व मानसिक लक्षणे निर्माण होऊ शकतात व योग्य वेळी ती लक्षणे समजून घेणे अतिशय आवश्यक असते व त्या लक्षणांवर योग्य वेळी उपचार करणे आवश्यक असते, अन्यथा त्याचे आजारामध्ये रूपांतर होऊ शकते. परंतु पुरुषांमध्ये याविषयी बिलकुलच जागरूकता नसते त्यामुळेच पुरुषांमधील अँड्रोपॉज समजून घेणे, त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने व दीर्घायुषी होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणूनच आपण सर्वजण हा विषय शास्त्रीय पद्धतीने समजावून घेऊ.

संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य मिलिंद कुलकर्णी यांनी सांगितले की हे व्याख्यान धर्माधिकारी मळा येथील आयुर्वेद व्यासपीठ येथे सकाळी १०-१२ या वेळेत होणार असून, हा कार्यक्रम नि:शुल्क असून, सर्वांसाठी खुला आहे. या कार्यक्रमासाठी नावनोंदणी आवश्यक असून ८०१०४९४९९६ क्रमांकावर संपर्क साधावा.

हिंदू मोची समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना प्राधान्याने मार्गी लावणार

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर – समाजामध्ये वावरत असताना प्रत्येकाने समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून सर्वांनी सामाजिक कार्यात योगदान दिले पाहिजे. हिंदू मोची समाजाने एकत्रित येऊन वारुळाचा मारुती परिसरात जागा खरेदी केली असून, त्या ठिकाणी समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. समाजाच्या कार्यामध्ये राजकारण न आणता सर्वांनी एकत्रित येऊन हिंदू धर्माचे सण-उत्सव उत्साहात साजरे करावेत, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर हिंदू मोची समाजसेवा संघाच्या वतीने समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आ. जगताप यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. आ. जगताप म्हणाले की, पूर्वी शहरातील अनेक रस्ते केवळ विकास आराखड्याच्या नकाशावर होते. मात्र, राज्य शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून हे रस्ते प्रत्यक्षात उतरविण्याचे काम करण्यात आले. वारुळाचा मारुती परिसर अनेक वर्षांपासून विकासकामांच्या दृष्टीने दुर्लक्षित होता. या परिसरातील रस्त्यांची कामे तसेच सीना नदीवरील पुलाचे काम मार्गी लावण्यात आले आहे.

दातरंगे मळा परिसरापासून बायपासपर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्णत्वास गेल्याने नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. जैनसमाजाच्या एकत्रित प्रयत्नांतून शहरात आनंदऋषी हॉस्पिटल उभे राहिले. या रुग्णालयाच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होत आहेत. इतर समाजांनीही या उपक्रमाचा आदर्श घेऊन सामाजिक कार्यासाठी पुढाकार घ्यावा. अशा प्रयत्नांतून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होते. हिंदू मोची समाजाचे जे प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत, ते सोडविण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील.



अहिल्यानगर हिंदू मोची समाजसेवा संघाच्या वतीने समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आ. संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला. (छायाचित्र : लहू दळवी)

तसेच राज्य शासनाकडेही याबाबत पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही आमदार जगताप यांनी दिली.

यावेळी हिंदू मोची समाजसेवा संघाचे ॲड. अविनाश साखला म्हणाले की, हिंदू मोची समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित होते. ते मार्गी लावण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी सहकार्य केले. त्याबद्दल समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यापुढील काळातही समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी ते सहकार्य करतील, अशी अपेक्षा आहे. वारुळाचा मारुती परिसरात समाजाच्या वतीने सामाजिक भवन उभारण्यात येणार असून, या भवनाच्या माध्यमातून समाजबांधवांची सेवा करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

या सोहळ्याप्रसंगी रतनलाल पवार, सुभाष बायड, मनोहर चौहान, किरण सोनग्रा, नरेंद्र गोयल, अरुणाताई गोयल, संतोष गोयल, चंपालाल सोनग्रा, बालकिशन गोयल, पवन सोनग्रा, मगन सिसोदिया, चंदन पवार, कमलेश सोनग्रा, दीपक सोनग्रा, ॲड. अविनाश साखला, अमित गोयल, मनीष सोनग्रा, बिपिन पीडीयार, राजेश पीडीयार, रामेश्वर चव्हाण, प्रितेश सोनग्रा, ॲड. गणेश गोंडाळ, सागर देवकर, रवी साखला उपस्थित होते.

नगरमध्ये महिलांसाठी २२ नोव्हेंबरला कर्करोग निदान शिबिराचे आयोजन

नगर– महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग याबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या आजारांची प्राथमिक लक्षणे वेळीच ओळखता यावीत आणि सुरुवातीच्या टप्प्यातच निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने भारत भारती नगर महिला शाखेच्या वतीने २२ नोव्हेंबर रोजी मोफत कर्करोग निदान व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत बालिकाश्रम रोडवरील श्री कमला आयुर्वेद हॉस्पिटल येथे होणार आहे, अशी माहिती भारत भारतीच्या अध्यक्षा स्वीटी पंजाबी यांनी दिली.

अधिक महिती देतांना सेक्रेटरी सोनल कांबळे म्हणाल्या, स्तनाचा व गर्भाशय मुखाचा कर्करोग या दोन्ही प्रकारच्या कर्करोगाचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास योग्य उपचारांद्वारे रुग्ण बरे होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. मात्र महिला याकडे दुर्लक्ष करत असल्याने महिलांच्या आरोग्याचा हा गंभीर प्रश्न लक्षात घेऊन केवळ जनजागृती न करता प्रत्यक्ष तपासणी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम भारत भारती महिला शाखेने हाती घेतला आहे. कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी आणि नियमित तपासणी का आवश्यक आहे, याबाबत तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

महिलांनी स्वतःची तपासणी करून घेण्याबरोबरच आपल्या मैत्रिणी, नातेवाईक आणि परिचित महिलांनाही या शिबिराची माहिती देऊन सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन शिबिराच्या प्रमुख डॉ. अंशु मुळे, डॉ. प्रतिभा शिनगारे, डॉ. मानसी कांबळे, डॉ. नयना जगताप, डॉ. अनिता जोशी, डॉ. भारती पाचारणे, डॉ. रत्ना बल्लाळ, डॉ. संजीवनी कराळे आणि डॉ. तनुजा पोळ यांनी केले आहे.



पत्रकार चौकाच्या काँक्रीटीकरणाच्या अंतिम टप्प्यातील कामाची पाहणी करताना उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक अजिंक्य बोरकर, मोहित पंजाबी, जितु गंभीर, स्वीय सहाय्यक अनुप काळे आदी.

पत्रकार चौकाचे लवकरच आकर्षक नव्या स्वरूपात सुशोभीकरण

नगर – शहर व उपनगर भागास जोडणाऱ्या महत्वाच्या पत्रकार चौकाचे लवकरच आकर्षक नव्या स्वरूपात सुशोभीकरण होणार आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या चौकाच्या काँक्रीटीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या कामची पाहणी उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक अजिंक्य बोरकर, मोहित पंजाबी, जितु गंभीर व स्वीय सहाय्यक अनुप काळे यांनी करून ठेकेदारास दर्जेदार काम करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी उपमहापौर जाधव म्हणाले, पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहराची वेगाने विकासाच्या दिशेने वाटचाल होत आहे. विविध विकासाचे प्रकल्प मार्गी लागत असून यासाठी भरीव विकास निधी प्राप्त होत आहे. पत्रकार चौकाचे काँक्रीटीकरणाचे काम अंतिम टप्यात आले आहे. शहराच्या वैभवात भर पडेल असा हा चौक होणार आहे. या कामामुळे काही दिवस वाहतुकीस अडचणी येणार असल्याने नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

अजिंक्य बोरकर म्हणाले, आ.संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरातील प्रमुख रस्त्यांचे कामे पूर्णत्वास आली आहेत. आता पत्रकार चौकात राहिलेल्या एका भागाचे काँक्रीटीकरणाचे सुरु झाले आहे. त्यामुळे भविष्यात या चौकाचे नवे आकर्षक स्वरूप दिसणार आहे. हे काम सुरु असताना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

सकल माळी समाजाच्या उपाध्यक्षपदी कुंडलिकराव गदादे पाटील



नगर – सकल माळी समाज संघटनेच्या उपाध्यक्षपदी कुंडलिकराव गणपतराव गदादे पाटील यांची निवड करण्यात आली. ही निवड संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र पडोळे यांनी केली.

राजेंद्र पडोळे यांनी माहिती देताना सांगितले की, गेल्या ४ ते ५ वर्षांपासून हे संघटन समाजात कार्यरत आहे. या संघटनेला सर्व समाजाने मान्यता दिली आहे. मान्यता देण्याचे विशेष कारण म्हणजे संघटनेचा मूळ उद्देश, हेतू आणि स्वप्न आहे, समाजासाठी मोफत हॉस्पिटल उभारणे. म्हणूनच या संघटनेला सर्व राजकीय पक्षांनी सुद्धा अंतर्गत राजकीय मतभेद बाजूला ठेवून मान्यता दिली आहे. अहिल्यानगर शहराच्या विविध भागात समाजाच्या बैठका झाल्या. राजकीय, सामाजिक, महिला, तरुण, ज्येष्ठ, शैक्षणिक, व्यापारी अशा सर्व क्षेत्रातील घटकांनी या संघटनेला मान्यता दिली. एक रुपयात सभासद नोंदणी ही संकल्पना सर्व समाजाला आवडली. कारण इतर संघटना सभासद फी हजार रुपये ठेवतात, त्यामुळे समाजाला आर्थिक अडचण होते. प्रत्येक घरात कमीत कमी ४ ते जास्तीत जास्त १० सभासद असतात, म्हणजे १० हजार रुपये खर्च होतो. म्हणून लोक म्हणतात, आमच्या घरचा एकच सभासद करा. ही अडचण लक्षात घेऊन संघटनेने १ रुपयात नोंदणीची संकल्पना आणली.



दोन चिमुकल्यांनी साकारला सिंधूदुर्ग किल्ला... सावेडी गावातील संग्राम वाकळे व यशराज वाकळे या दोन चिमुकल्या भावांनी दीपावलीनिमित्त भव्य सिंधूदुर्ग किल्ला साकारला आहे.



तंबाखूचा धोका जास्त

सिगारेट जास्त धोकादायक आहेत की तंबाखू, हा प्रश्न विचारल्यावर बहुतेक लोक 'सिगारेट' असे उत्तर म्हणतात. तथापि, अलिकडच्या एका अभ्यासात दिसून आले आहे की, तंबाखू आपल्या शरीराचे सिगारेटपेक्षा जास्त पटींनी नुकसान करते.

सिगारेटच्या धुराचे हवेत बाष्पीकरण होते, तर तंबाखू थेट आपल्या तोंडातील पेशींना नुकसान पोहोचवते. यामुळे जखमा होतात. त्या हळूहळू कर्करोगात बदलतात. एका जागतिक अभ्यासातून दिसून आले आहे, की दररोज तंबाखू सेवन करणाऱ्या लोकांमध्ये तोंड आणि घशाचा कर्करोग जगभरात सामान्य आहे. यामुळे कर्करोगाच्या पेशी वेगाने विकसित होतात आणि संपूर्ण तोंडात पसरतात. अनेक प्रकरणांमध्ये हा कर्करोग घशातही पसरतो.



संशोधनात, शास्त्रज्ञांना आढळून आले, की तंबाखूमध्ये आढळणारे नायट्रोसामाइन्स आणि पॉलीसायक्लिक अरोमॅटिक हायड्रोकार्बन्ससारखे पदार्थ आपल्या पेशींमधील 'डीएनए'चे ला थेट नुकसान करतात आणि निरोगी पेशींना मारून कर्करोगाच्या पेशी वाढवतात.

दुसरीकडे, सिगारेटमध्ये निकोटीन आणि टारचे प्रमाण जास्त असते. हे आपल्या फुप्फुसांना नुकसान पोहोचवतात; परंतु त्यातून निघणारा धूर थेट शरीराशी किंवा पेशींशी संपर्क साधत नाही. त्यामुळे ते तंबाखूपेक्षा कमी हानिकारक बनते.

आरोग्यवेध

व्यसनी कसे होतात?

आजकाल तंबाखू आणि गुटखा खाण्याची फॅशन झाली आहे. तरुण लोक तणाव, नैराश्य किंवा साथीदारांच्या दबावामुळे या व्यसनाधीन पदार्थांचे सेवन करू लागतात. हळूहळू ती सवय बनते. एकदा व्यसनाधीन झाल्यानंतर ते सोडणे खूप कठीण होते. दररोज गुटखा किंवा तंबाखू चघळल्याने तोंडात हळूहळू किरकोळ जखमा होतात. याव्यतिरिक्त दात किडणे आणि हिरड्यांचे आजार होऊ शकतात. त्यातून शेवटी कर्करोग होऊ शकतो.

उपचार काय आहे?

कर्करोगाचा उपचार अनेकदा कठीण आणि महाग असतो. शिवाय, रुग्णाच्या जगण्याची शक्यता कमी असते. कारण बहुतेक प्रकरणांमध्ये तो आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात आढळतो. ही सवय लवकर बंद केली तर कर्करोगासारखा गंभीर आजार टाळता येऊ शकतो. त्यासाठी जागरूकता वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सरकारे आणि अनेक स्वयंसेवी संस्था या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

पायाच्या स्नायूंमधील वेदना दुर्लक्षू नका!

रात्री गाढ झोपेत असताना अचानक पायाच्या स्नायूंमध्ये तीव्र कळ येऊन झोप उडणे, ज्याला सामान्य भाषेत 'पायात गोळा येणे' म्हटले जाते, हा अनुभव अनेकजण घेतात. काही वेळेस पायाचा मागचा भाग इतका आखडतो की, काही सेकंद किंवा मिनिटे पाय हलवणेदेखील कठीण होऊन बसते. ही वेदना काही काळापुरती असली, तरी त्या क्षणी होणारी अस्वस्थता अत्यंत त्रासदायक असते. अनेकजण या समस्येला सामान्य मानून दुर्लक्ष करतात; पण ब्रिटनच्या 'नॅशनल हेल्थ सर्व्हिस'नुसार, हा त्रास वारंवार होत असेल, तर त्यामागे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे, मज्जासंस्थेवर ताण किंवा काही औषधांचे दुष्परिणाम यांसारखी महत्त्वाची कारणे असू शकतात. वैद्यकीय भाषेत याला 'नॉक्टर्नल लेग क्रॅम्प्स' म्हणतात. यामध्ये पायांच्या स्नायूंमध्ये अचानक आणि अनैच्छिक आकुंचन होते. स्नायू अत्यंत कडक होतात आणि तीव्र वेदना सुरू होतात. ही कळ काही सेकंदांपासून ते काही मिनिटांपर्यंत राहू शकते. कळ निघून गेल्यानंतरही संबंधित स्नायूमध्ये काही तासांपर्यंत मंद वेदना किंवा संवेदनशीलता जाणवू शकते.



जाणून घ्या

पायात गोळा येण्याची मुख्य कारणे

* शरीरात पाण्याची कमतरता : दिवसभरात पुरेसे पाणी न पिण्यामुळे स्नायूंमधील इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन बिघडल्याने रात्री क्रॅम्प्स येतात.
* औषधांचे दुष्परिणाम : उच्च रक्तदाबासाठी वापरली जाणारी औषधे किंवा कोलेस्टेरॉल कमी करणारी 'स्टॅटिन' प्रकारची औषधे घेणाऱ्यांना हा त्रास होऊ शकतो.
* तिमद्यपान आणि यकृताचे आजार : मद्यपानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण घटते आणि यकृताच्या कार्यात अडथळा आल्याने स्नायूंवर परिणाम होतो.
* स्नायूंवर अतिरिक्त ताण : दिवसभर जास्त वेळ उभे राहणे, कडक उन्हात काम करणे किंवा अचानक जास्त व्यायाम केल्याने स्नायूंवर ताण येतो.
* पोषक घटकांची कमी : शरीरात कॅल्शियम, मॅग्नेशियम किंवा पोटॅशियम या खनिजांची कमतरता असल्यास मज्जासंस्थेचे संदेश स्नायूपर्यंत व्यवस्थित पोहोचत नाहीत.
* वाढते वय आणि गर्भावस्था : वय वाढल्यानंतर स्नायू कमकुवत होतात. तसेच गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यात शरीराचा भार वाढल्याने महिलांना हा त्रास अधिक होतो.

झोपेत अचानक पायात कळ आल्यास काय कराल?

* सरळ उभे राहा : बिछान्यातून उठून सावकाशपणे जमिनीवर पाय ठेवून सरळ उभे राहण्याचा प्रयत्न करा. पायावर शरीराचा हलका भार पडल्यास क्रॅम्प लवकर कमी होतो.
* हळुवार स्ट्रेचिंग करा : पायाची बोटे वरच्या दिशेने (घोट्याकडे) ओढा. त्यामुळे मागचे स्नायू स्ट्रेच होऊन आराम मिळेल.
* झोपण्यापूर्वी हलके व्यायाम : वारंवार हा त्रास होत असल्यास रात्री झोपण्यापूर्वी पाच मिनिटे पायाचे हलके स्ट्रेचिंग करा.

सामान्य पण महत्त्वाचे!

चालताना धाप लागणे, थोडे काम केल्यानंतर छातीत दुखणे किंवा वारंवार थकवा जाणवणे, अशी लक्षणे अनेकजण गॅस, अशक्तपणा किंवा वाढत्या वयाचा परिणाम समजून दुर्लक्षित करतात. मात्र, काही वेळा ही लक्षणे हृदयाच्या स्नायूंना रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण झाल्याचे संकेत असू शकतात. या रक्तवाहिन्यांमधील अडथळ्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढू शकतो. काही प्रकरणांमध्ये हा झटका जीवघेणाही ठरू शकतो.

विशेषत: पायऱ्या चढताना, वेगाने चालताना किंवा थोडे शारीरिक काम केल्यानंतर वारंवार ही लक्षणे जाणवत असतील आणि विश्रांती घेतल्यावर कमी होत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. काही रुग्णांना छातीत तीव्र वेदना होण्याऐवजी केवळ धाप लागणे, असामान्य थकवा किंवा अस्वस्थता जाणवू शकते. वेळेवर तपासणी केल्यास रक्तवाहिन्यांमधील अडथळा ओळखून गंभीर गुंतागुंत होण्याचा धोका कमी करण्यासाठी उपचार करता येतात. हृदयाचे कार्य सुरळीत सुरू राहण्यासाठी त्याला पुरेशा प्रमाणात रक्त आणि ऑक्सिजन मिळणे आवश्यक असते. कोरोनरी धमन्यांमध्ये कोलेस्टेरॉल आणि इतर पदार्थ साचल्यामुळे रक्तवाहिन्यांचा मार्ग अरुंद होऊ शकतो. त्यामुळे हृदयाच्या स्नायूंना होणारा रक्तपुरवठा कमी होतो.



डाव्या मुख्य कोरोनरी धमनीला विशेष महत्त्व आहे. या धमनीतून निघणाऱ्या शाखांद्वारे हृदयाच्या मोठ्या भागाला रक्तपुरवठा होतो. त्यामुळे या धमनीमध्ये गंभीर अडथळा निर्माण झाल्यास हृदयाच्या मोठ्या भागाला रक्त आणि ऑक्सिजनचा पुरवठा बाधित होऊ शकतो. डाव्या मुख्य धमनीतील अडथळा ही गंभीर स्थिती मानली जाते; मात्र रुग्णावर कोणता उपचार करायचा, याचा निर्णय अँजिओग्राफीचा अहवाल आणि रक्तवाहिन्यांची स्थिती तपासल्यानंतरच घेतला जातो. काही रुग्णांमध्ये बायपास शस्त्रक्रियेऐवजी अँजिओप्लास्टी हा पर्यायही योग्य ठरू शकतो.

पुढील लक्षणे वारंवार जाणवत असतील, तर त्याकडे विशेष लक्ष द्यावे.

* चालताना किंवा पायऱ्या चढताना धाप लागणे.
* शारीरिक श्रम करताना छातीत दुखणे किंवा दाब जाणवणे.
* थोडे काम केल्यानंतरही असामान्य थकवा जाणवणे.
* वेदना खांदा, हात, पाठ किंवा जबड्यापर्यंत पसरणे.
* विश्रांती घेतल्यानंतर त्रास कमी होणे.

ही लक्षणे वारंवार जाणवत असतील, तर स्वत:हून औषधे घेण्याऐवजी डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. डॉक्टर अडथळा नेमका कुठे आहे, तो किती गंभीर आहे, किती रक्तवाहिन्या प्रभावित झाल्या आहेत आणि रक्तवाहिन्यांची रचना कशी आहे, याची तपासणी करतात. त्यानुसार औषधोपचार पुरेसे ठरतील की अँजिओप्लास्टी करावी लागेल की बायपास शस्त्रक्रिया अधिक योग्य ठरेल, हे निश्चित केले जाते.

सामान्य ज्ञान

हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होण्याचा धोका वाढवणाऱ्या कारणांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, वाढलेले कोलेस्टेरॉल, धूम्रपान, लठ्ठपणा, शारीरिक हालचालींचा अभाव आणि कुटुंबातील हृदयविकाराचा इतिहास यांचा समावेश होतो. हा धोका कमी करण्यासाठी पुढील बाबींकडे लक्ष द्यावे.

* नियमित तपासणी : रक्तदाब, रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलची तपासणी करावी.
* धूम्रपान टाळा : धूम्रपानामुळे रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊन हृदयविकाराचा धोका वाढतो.
* वजन नियंत्रणात ठेवा : संतुलित आहार आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित व्यायाम करावा.
* आहाराकडे लक्ष द्या : अतिरिक्त मीठ, ट्रान्स फॅट आणि अतिप्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांचे सेवन कमी करावे.
* वैद्यकीय सल्ला पाळा : मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा कोलेस्टेरॉलची समस्या असल्यास निर्धारित उपचार नियमित घ्यावेत.

हृदयविकाराची लक्षणे वेळेत ओळखणे आणि त्यानुसार उपचार घेणे महत्त्वाचे आहे. धाप लागणे किंवा छातीत दुखणे ही प्रत्येक वेळी हृदयातील ब्लॉकेजचीच लक्षणे असतात असे नाही. मात्र, त्यामागील कारण तपासून घेणे आवश्यक आहे. योग्य वेळी निदान आणि उपचार केल्यास गंभीर गुंतागुंत होण्याचा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते.

स्मरणशक्ती सुधारण्यासाठी

आपली स्मरणशक्ती टिकून रहावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. पण आजच्या काळात अनेक कारणांमुळे विस्मरणाचं प्रमाण वाढत चाललं आहे. तल्लख बुद्धीसाठी तसंच स्मरणशक्ती टिकवून ठेवण्यासाठी काही आयुर्वेदिक औषधी उपयुक्त ठरू शकतात. अशाच काही औषधींविषयी...

ब्राह्मी: हा स्मरणशक्ती सुधारण्याचा रामबाण उपाय आहे. या गुणधर्मामुळे ब्राह्मीवर बरंच संशोधनही झालं आहे. ब्राह्मीच्या सेवनाने मेंदूची क्षमता सुधारते. यासोबतच या औषधामुळे मेंदू ताजातवाना होतो. आपल्याला खूप शांत वाटतं. ताण सुधारून मेंदूला चालना मिळते. यासोबतच हे औषध शरीरातल्या विविध पेशींना झालेलं नुकसानही भरून काढतं. अश्वगंधामुळे मेंदूची सर्वांगिण कार्यक्षमता वाढते आणि स्मरणशक्तीही सुधारते.



आयुर्वेद आणि विकार

ज्येष्ठमध : ही मेंदूच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त औषध आहे. ज्येष्ठमधाच्या सेवनानंतर आपल्याला खूप शांत वाटतं. ताण, चिंता, काळजी अशा मानसिक आजारांवरही ज्येष्ठमध उपयुक्त ठरतो. त्यामुळे ज्येष्ठमधाचं नियमित सेवन करायला हवं.

जिंको: या आयुर्वेदिक औषधावर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. जिंकोमुळे मज्जासंस्थेचं रक्ताभिसरण कमी करण्यासाठीही ब्राह्मीचा वापर करता येईल.



अशी करावी योगासने

योगासनांमुळे आरोग्य उत्तम रहायला मदत होत असली तरी ही आसनं योग्य पद्धतीने करणंही गरजेचं असतं. योगासनं करताना होणाऱ्या काही चुकांमुळे त्रास होऊ शकतो. त्यातही नवखे असताना बरीच काळजी घ्यावी लागते.

नवख्यांनी योगा क्लासमध्ये पहिल्या रांगेत बसण्याऐवजी शक्यतो मागे बसावं. यामुळे योगा प्रशिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष ठेवता येईल. दुसरं म्हणजे क्लासमधल्या इतरांची कृतीही न्याहाळता येईल.

काहीजण श्वास जास्त वेळ रोखून धरतात. पण हे चुकीचं आहे. ३० सेकंदांपेक्षा जास्त वेळ श्वास रोखून धरू नये. श्वास जास्त काळ रोखून धरल्यामुळे शरीरातल्या ऑक्सिजनच्या प्रवाहावर परिणाम होऊन घुसम टल्यासारखं वाटू शकतं.

आपण कुठे चुकतो

योगा करताना शरीराची स्थिती योग्य असणंही तितकंच गरजेचं आहे. बसण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे योगाचे काहीच लाभ मिळणार नाहीत. शिवाय इतर दुखणी मागे लागू शकतात. अखेरच्या टप्प्यात शवासन केलं जातं. यामुळे योग केल्यानंतर शरीराला आराम मिळतो. म्हणूनच शवासन टाळू नये. भरल्या पोटी योगा करू नये.

तरुण बनताहेत निद्रानाशाचे बळी


आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत प्रत्येकजण आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे. काम, अभ्यास, सोशल मीडिया, गेम आणि ताणतणाव हे त्यांच्या आरोग्यापासून अधिकाधिक लक्ष विचलित करत आहेत. परिस्थिती अशा टप्प्यावर पोहोचली आहे, की जिथे तासनतास रील बघण्याच्या व्यसनामुळे आपली झोप हळूहळू दुर्लक्षित होत आहे. परिणामी, आपण जागे होतो, तेव्हा दिवसभर थकवा आणि आळस जाणवतो. न्यूझीलंडमधील ओटागो विद्यापीठात केलेल्या अलीकडील संशोधनातून असे दिसून आले आहे, की झोपण्यापूर्वी मोबाईल स्क्रीनवर सक्रिय असणाऱ्या आजच्या तरुणांची, विशेषत: किशोरवयीन मुलांच्या झोपेची गुणवत्ता खराब होत आहे. आजकाल, विविध कारणांमुळे तरुणांना पुरेशी आणि चांगली झोप मिळत नाही. वाढलेला स्क्रीन टाइम हे झोपेच्या विकारांचे सर्वात मोठे कारण आहे. दिवसभरच नव्हे तर झोपण्यापूर्वीदेखील मोबाईल फोन, लॅपटॉप आणि टेलिव्हिजनचा वापर केला जात आहे. शारीरिक हालचालींचा अभावदेखील तरुणांच्या झोपेला अडथळा आणत आहे.

आरोग्य वार्ता

दिवसभर बसून अभ्यास करणे किंवा गेम खेळणे ही सामान्य गोष्ट झाली आहे. 'सोशल मीडिया'चा दबाव, सतत ऑनलाइन राहणे, इतरांच्या पोस्ट पाहणे यामुळे मनाला आराम मिळत नाही. परिणामी चांगली झोप येत नाही. याव्यतिरिक्त, रात्री उशिरा नाश्ता, जड जेवण किंवा कॅफिनयुक्त पेये पिण्यामुळे झोपेत व्यत्यय येतो.

संशोधन काय म्हणते?

ओटागो विद्यापीठाने याबाबत केलेल्या संशोधनात शंभरहून अधिक किशोरवयीन मुलांच्या झोपेच्या आणि झोपेपूर्वीच्या सवयींचे परीक्षण करण्यात आले. अभ्यासात दिसून आले, की ९९ टक्के किशोरवयीन मुले झोपेपर्यंत स्क्रीन वापरतात. ६३ टक्के किशोरवयीन मुले झोपण्यापूर्वी काहीतरी खातात. २२ टक्के किशोरवयीन मुले झोपण्यापूर्वी व्यायाम करतात. तथापि, ज्यांनी या सवयी टाळण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या झोपेत फारसा फरक दिसला नाही.



या सवयींमुळे झोपेची गुणवत्ता सुधारेल

दररोज सकाळी थकवा जाणवत असेल किंवा रात्री नीट झोप येत नसेल, तर काही सोप्या सवयी अवलंबण्याचा प्रयत्न करावा. दररोज ठराविक वेळी झोपावे आणि उठावे. रात्री शांत करणाऱ्या क्रियाकलापांमध्ये व्यस्त रहावे, जसे की पुस्तक वाचणे, संगीत ऐकणे किंवा ध्यान करणे. झोपण्यापूर्वी जास्त खाऊ नये; पण भूकही लागू देऊ नये. संध्याकाळी पाचनंतर कॅफिनयुक्त पदार्थ टाळावेत आणि स्क्रीन टाइम मर्यादित करावा.

नर्व्हस ब्रेकडाउनविषयी...

सध्याच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक युगात प्रत्येकावर ताणाने कुरघोडी केली आहे. आज मानसिक आणि शारीरिक ताणतणावांपासून कोणीही लांब राहिलेलं नाही. आयुष्यातल्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करताना प्रत्येकाला कधी ना कधी हरल्यासारखं, थकल्यासारखं वाटतं, आयुष्यात काहीच उरलेलं नाही अशी भावना निर्माण होते. ताणामुळे दैनंदिन आयुष्यातली कामं करताना अडचणी येतात. या स्थितीला नर्व्हस ब्रेकडाऊन असं म्हटलं जातं. नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नाही. मात्र नैराश्य, पोस्ट ट्रॉमेटिक स्ट्रेस डिसऑर्डरसारख्या मानसिक विकारांचे परिणाम विषद करण्यासाठी या शब्दाचा वापर केला जातो.

नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नसल्यामुळे याची लक्षणं व्यक्तिनुसार आणि त्याच्या मानसिक स्थितीनुसार बदलत रहातात. मात्र याची काही सर्वसाधारण लक्षणं असतात. सतत अस्वस्थ वाटणं, नैराश्य, भीतीची भावना वाढीस लागणं, झोपेत अडथळे येणं, आहाराच्या सवयींमध्ये बदल होणं, एकाग्रता भंग पावणं, मनात आत्महत्येचे विचार येणं, मूड बदलत रहाणं, श्वास घ्यायला त्रास होणं, छातीत दुखणं, चक्कर येणं, पोट बिघडणं, सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी न होणं, एकटं रहाणं ही नर्व्हस ब्रेकडाउनची काही लक्षणं आहेत.



खास बात

नर्व्हस ब्रेकडाऊनची बरीच कारणं असतात. प्रचंड ताण आणि दबावामुळे माणूस नैराश्याच्या गर्तेत जाऊ शकतो. जवळच्या व्यक्तीचा अचानक झालेला मृत्यू माणसाला निराश करून सोडतो. सततचा कामाचा ताण, आर्थिक चणचण, जबाबदाऱ्यांचं ओझं, अभ्यासाचा ताण, शारीरिक आणि मानसिक त्रास अशा असंख्य बाबी नर्व्हस ब्रेकडाऊनला कारणीभूत ठरू शकतात.

नर्व्हस ब्रेकडाउन किंवा इतर कोणत्याही मानसिक विकारावर उपचार आहेत. रुग्णाची मानसिक स्थिती आणि लक्षणं यावर उपचारांची दिशा ठरते. उपचारांची पद्धत व्यक्तिनुसार बदलत रहाते. लक्षणांनुसार डॉक्टर समुपदेशन किंवा सायकोथेरेपीचा सल्ला देतात. काही औषधंही लिहून दिली जातात. यात नैराश्य कमी करणाऱ्या औषधांचा समावेश असतो.


जीवनशैलीतले काही बदलही नर्व्हस ब्रेकडाऊन, नैराश्य, ताण अशा मानसिक आजारांना आळा घालू शकतात. हा त्रास कमी करण्यासाठी वादविवाद लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. शरीरासोबतच मनाला आराम देणारे योगा, मेडिटेशन, दीर्घ श्वसन असे व्यायाम नियमित तपणे करा. दररोज किमान ३० मिनिटं व्यायाम केल्याने बराच फरक पडू शकतो. घराबाहेर पडा, आवडीच्या गोष्टी करा. एकटेपणामुळे नैराश्यात वाढ होऊ शकते.

त्यामुळे वेगवेगळ्या लोकांशी संवाद साधा, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हा. झोपण्याच्या वेळा निश्चित करा. सकस आहार घ्या. अल्कोहोल, कॅफेन यांचं सेवन कमी प्रमाणात करा. काही कारणांमुळे आयुष्यात नैराश्याचे प्रसंग येतात. पण याचा अर्थ तुम्ही नर्व्हस ब्रेकडाऊनला बळी पडला आहात असा होत नाही. त्यामुळे लक्षणं जाणून मगच उपचार करा.

धोका गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा

गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग आणि त्याला कारणीभूत ठरणारा 'ह्युमन पॅपिलोमा व्हायरस' (एचपीव्ही) या संदर्भात 'ग्रीनरे लॅब्स'ने गेल्या पाच वर्षांत केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष समोर आले आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, ओडिशा आणि अरुणाचल प्रदेशातील इटानगर या भागांमधून गोळा करण्यात आलेल्या १२,३७३ नमुन्यांच्या विश्लेषणातून ३१ ते ५० वयोगटातील महिलांना गर्भाशय मुखाचा सर्वाधिक धोका असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

संसर्ग आढळलेल्या महिलांपैकी ३४.५ टक्के महिलांमध्ये एकाच वेळी दोन किंवा अधिक धोकादायक एचपीव्ही प्रकारांचा संसर्ग आढळला आहे. 'एचपीव्ही- १६' हा प्रकार सर्वाधिक महिलांमध्ये आढळला असून, त्यापाठोपाठ एचपीव्ही-३१, ३३ आणि १८ हे धोकादायक प्रकारही आढळून आले आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, ओडिशा आणि अरुणाचल प्रदेशातील इटानगर येथील नमुन्यांच्या विश्लेषणानुसार महाराष्ट्रात 'एचपीव्ही' आढळण्याचे प्रमाण २.४ टक्के, कर्नाटकात ३.६ टक्के, ओडिशात ३.१ टक्के, तर इटानगरमध्ये ६.५ टक्के असल्याचे निदर्शनास आले.



आरोग्य वेध

'जागतिक आरोग्य संघटनेने गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग संपवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जगात दर दोन मिनिटांनी एका महिलेचा या आजारामुळे मृत्यू होतो. भारतात २०२४ मध्ये या आजारामुळे सुमारे ३६ हजार महिलांचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे, असेही या संशोधनात नमूद करण्यात आले आहे. वेळेत 'एचपीव्ही' तपासणी आणि आवश्यक उपचार केल्यास हा कर्करोग टाळता येऊ शकतो. त्यामुळे महिलांनी तपासणीबाबत जागरूक राहणे आणि 'एचपीव्ही' आढळल्यास घाबरून न जाता डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील तपासणी करणे आवश्यक असल्याचेही या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

उद्याचे मार्केट लीडर्स शोधणे - मल्टीकॅप गुंतवणुकीचा मार्ग



केतन बलदोटा

प्रत्येक प्रस्थापित मार्केट लीडरची स्वतःची एक वाढीची कथा असते. काही व्यवसाय नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करून विस्तार करतात, इतर व्यवसाय नावीन्यपूर्णतेच्या माध्यमातून स्वतःची स्थिती बळकट करतात, तर इतर काहींना त्यांचे उद्योग अधिक संघटित झाल्यामुळे फायदा होतो.

मल्टीकॅप म्युच्युअल फंड या व्यवसायांना एकाच पोर्टफोलिओमध्ये एकत्र आणतात. गुंतवणुकीच्या आराखड्यानुसार, त्यांनी लार्ज-कॅप, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप समभागांमध्ये प्रत्येकी किमान २५ टक्के वितरण करणे आवश्यक असते. या वैविध्यपूर्ण एक्सपोजरमुळे कोणत्याही एकाच मार्केट-कॅप सेगमेंटवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होऊ शकते, तर गुंतवणूकदारांना संपूर्ण अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या व्यवसाय चक्रांमध्ये आणि वाढीच्या संधींमध्ये भाग घेण्याची संधी मिळते.

उद्योगाची रचनाही महत्त्वाची असते. एकत्रीकरणाच्या मार्गावर असलेल्या क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या व्यवसायांना त्यांची उपस्थिती वाढविण्याची संधी मिळू शकते. उत्तराधिकाराचे योग्य नियोजन आणि व्यवसायाच्या बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता यांमुळे शाश्वत वाढीला आणखी आधार लाभू शकतो. फंड मॅनेजर पोर्टफोलिओ तयार करताना व्यवसायांचे चक्र, बाजारपेठेची परिस्थिती आणि कंपनीच्या मूलभूत गोष्टींच्या आकलनासह हे मूल्यांकन एकत्र करू शकतात.

दीर्घ अवधी हाती असलेल्या गुंतवणूकदारांच्या दृष्टीने मल्टीकॅप गुंतवणुकीमुळे व्यावसायिकरीत्या व्यवस्थापन होणारे व्यवसाय आणि उदयोन्मुख संधींपर्यंत मार्ग सुकर होतो. तसेच भारतातील कॉर्पोरेट वाढीच्या पुढील पिढीच्या कहाण्यांमध्ये सहभागी होण्याची संभाव्यता लाभते.

ऑक्टोबर १९९४ मध्ये लाँच झालेला आयसीआयसीआय प्रुडेन्शियल मल्टीकॅप फंड हा या श्रेणीतील सर्वात जुन्या ऑफरपैकी एक आहे. यामध्ये संरचनात्मक आणि चक्रीय गुंतवणूक धोरणाच्या मिश्रणाद्वारे मिड आणि स्मॉल कॅपच्या वाढीची संभाव्यता आणि लार्ज-कॅपची लवचिकता यांचा मिलाफ करण्यात येतो. या फंडाने ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत तीन वर्षांमध्ये १२.६२ टक्के, पाच वर्षांमध्ये ११.४८ टक्के आणि स्थापनेपासून १४.५३ टक्के सीएजीआर (वार्षिक चक्रवाढ वृद्धिदर) दिला आहे.

मॉर्फ केलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी; नगर मधील तरुणीवर अत्याचार, गुन्हा दाखल

नगर – मॉर्फ केलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देत एका २३ वर्षीय तरुणीवर सावेडी उपनगरातील एका हॉटेलमध्ये जबरदस्तीने अत्याचार केल्याची घटना १९ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. तसेच आरोपीने ही बाब कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नालेगाव येथील २३ वर्षीय गृहिणी असलेल्या तरुणीने २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी फिर्याद दिली आहे. आरोपी सिद्धार्थ रामदास थोरवे (पोलीस पाटील, रा. सोलापूरवाडी, ता. आष्टी, जि. बीड) याच्याविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीने पिडीतेच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर कॉल करून प्रोफेसर चौकात भेटायला ये, अन्यथा फोटो व्हायरल करेन अशी धमकी दिली. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.४५ वाजताच्या सुमारास पिडीता प्रोफेसर चौकात असताना आरोपीने पुन्हा इंस्टाग्राम कॉल केला.त्यानंतर आरोपी मोटारसायकलवरून पिडीतेजवळ आला आणि तिला गाडीवर बसण्यास सांगितले. आरोपीने पिडीतेला मोटारसायकलवर बसवून सावेडीतील मिस्तबाग महालाजवळ असलेल्या हॉटेल आदिराज येथे नेले.

तेथे आरोपीने पिडीतेला हॉटेलच्या पाठीमागून जाण्यास सांगितले आणि एका रूममध्ये नेले.रूममध्ये आरोपीने पिडीतेचे मॉर्फ केलेले फोटो दाखवले व सर्व फोटो डिलीट करण्यासाठी शारीरिक संबंध ठेवण्याची मागणी केली. नकार दिल्यास सर्व फोटो व्हायरल करण्याची धमकी देत त्याने पिडीतेच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला.याबाबत कोणाला काही सांगितल्यास जिवे मारून टाकण्याची धमकीही आरोपीने दिल्याचे तक्रारीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी सिद्धार्थ थोरवे याच्या विरुध्द बीएनएस कलम ६४ (२)(एम), ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

गुरुवाणी - ११८

खरा पुरूषार्थ...

सूर्यकांता राणीने नेमकं काय केले? तिने राजा प्रदेशीला विषयुक्त भोजन दिले एवढेच सर्वांना माहीत आहे. सूर्यकांताने विष देताना आहाराबरोबरच राजाचे आभूषणे, वस्त्र सगळेच विषयुक्त केले. तिने थंड डोक्याने पूर्ण प्लानिंग केली होती. राजा प्रदेशी शांत चित्ताने पारणा करत असताना विषामुळे त्याच्या शरीरात प्रचंड दाह निर्माण झाला. त्याच्या लक्षात आले आपल्याला विष दिले गेले. मात्र त्याने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. कोणी विष देणे की नाही हे तुमच्या हातात नाही. पण त्यानंतरही आपल्या श्रद्धेचे अमृत टिकवून ठेवणे हे तुमच्या हातात असते. भीषण संकटात जितका संयम ठेवाल त्यापेक्षा जास्त उपलब्धी होईल. यासाठी द्वेष मुक्त जगण्याची साधना करावी लागते. आपणही प्रतिकूलता आल्यावर द्वेष जागृत होणार नाही याची साधना सुरु करावी. परिस्थितीमुळे माझे आयुष्य बनत नाही, माझे निर्णय, माझे वागणे आयुष्य बनवते. माझे कर्म बंध माझ्या विचारांमुळे होतात. पाप कर्म न करण्यासाठी पुरुषार्थ लागतो. प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यासाठी एफर्टस लागतात. राग व्यक्त करण्यासाठी ताकद नाही लागत, राग व्यक्त न करण्यासाठी ताकद लागते. पाप न करण्यासाठी जर जोरदार प्रयत्न केले तर जुन्या पापांचीही निर्जरा होते. रोजच्या जीवनात छोट्या छोट्या गोष्टींपासून या साधनेची प्रॅक्टिस करा. आज प्रत्येकाच्या जीवनात प्रतिकूलता अधिक आहे. राजा प्रदेशीचे मन सगळं कळूनही भूकंपरोधी बनले होते. त्यांच्या संयमाच्या घराला तडा गेला नाही. त्याने आहार फेकून दिला नाही. तो आहार घेऊन पौषध शाळेत जातो. पण तो वैद्याला बोलावत नाही. तो आसन लावून स्वतः सल्लेखना साधना सुरु करतो. आपल्या आराध्यांशी संवाद साधतो. त्याने गुरूला वचन दिलेलं असते, मी पुन्हा बिघडणार नाही. गुरूला दिलेले वचन वरदान असते. तुम्ही सुद्धा तुमच्या गुरूंना वचन द्या. तुम्हाला वरदानच मिळेल. राजा प्रदेशीसारखे शरीराला सोडतात तर सामान्य व्यक्तीला शरीर सोडते, हा फरक असतो. रात्री झोपताना कधीही मनात विष ठेवून झोपू नका. विषमुक्त झोपण्यास सुरुवात केली तर तनमन स्वस्थ होईल. राजा प्रदेशी देवलोकात जातो. आता चातुर्मास व्यवस्थेसाठी सहकार्य करणाऱ्यांबाबत बोलतो. लाडके आमदार संग्राम जगताप यांनी अतिशय मोलाचे सहकार्य करत योगदान दिले. जागा उपलब्ध करून देणारे ॲड. शिवाजीराव काकडे परिवार, सीसीटीव्ही व्यवस्था, पॅरेंटिंग शिबिरासाठी परिश्रम घेणारे, सूत्रसंचालक प्रसाद बेडेकर, सर्व पत्रकार अशा सर्वांचेच अभिनंदन करतो.

- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

राष्ट्रवादीच्या माजी तालुकाध्यक्षाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग


केडगाव उपनगरातील घटना, विनयभंगासह पोक्सोचा गुन्हा दाखल

नगर – केडगाव परिसरात असलेल्या पिंकसिटी जवळ एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. ही घटना १६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली असून २० नोव्हेंबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) माजी पारनेर तालुकाध्यक्ष विक्रमसिंह बबनराव कळमकर (रा. कळमकरवाडी, ता. पारनेर) याच्या विरुद्ध विनयभंगासह पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत मुलीची आई असलेल्या ३३ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. फिर्यादी या मुळच्या पारनेर तालुक्यातील रहिवासी असून त्या सध्या केडगाव उपनगरात भाडोत्री खोलीत राहतात. घटनेच्या वेळी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी घरात एकटीच असल्याची माहिती आरोपीला होती. या संधीचा फायदा घेत आरोपी विक्रमसिंह कळमकर याने राहत्या घरात प्रवेश केला. आरोपीने पीडित अल्पवयीन मुलीशी अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केला.तसेच या प्रकाराबद्दल कोणालाही काही सांगू नये, असा धमकीचा इशारा आरोपीने पीडितेला दिला.

याबाबतचा गुन्हा सुरुवातीला पारनेर पोलीस ठाण्यात नोंदवला गेला होता, मात्र घटनास्थळ अहिल्यानगर हद्दीत येत असल्याने झिरो नंबरने गुन्हा कोतवाली पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. गुन्हा झिरो नंबरने वर्ग होऊन आल्यानंतर कोतवाली पोलीस ठाण्यात २० नोव्हेंबर रात्री आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याच्या (पोक्सो) कलम ८, १२ आणि १८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुधीर क्षीरसागर हे करीत आहेत.

दरम्यान आरोपी विक्रमसिंह कळमकर याच्यावर या गुन्ह्यातील फिर्यादी महिलेने मागील आठवड्यात पारनेर पोलीस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल केलेला आहे. तर आरोपीच्या पत्नीने फिर्यादी महिलेवर सुपा पोलीस ठाण्यात आपल्या पतीला खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल केलेला आहे. आरोपी विक्रमसिंह कळमकर याच्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल होताच त्याला राष्ट्रवादी काँग्रेसच्या पारनेर तालुकाध्यक्ष पदावरून तडकाफडकी काढून टाकण्यात आलेले आहे.



डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन

* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

जिल्हा भाजपच्या वतीने २२ नोव्हेंबर रोजी लोकशाही वाचवा अराजकता हटवा मोर्चा

नगर – भारतीय जनता पार्टीच्या नगर शहर, दक्षिण व उत्तर जिल्हाच्या वतीने २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता लोकशाही वाचवा अराजकता हटवा या मोर्चा व सभेचे आयोजन करण्यात आले आहे. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे व विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या मोर्चात पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे, जिल्हा प्रभारी लक्ष्मण सावजी, जिल्हा प्रभारी भैरवी वाघ यांच्यासह लोकप्रतिनिधी, शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी सहभागी होणार आहेत. या मोर्च्याची सांगता दिल्लीगेट येथे होणाऱ्या विराट जाहीर सभेने होईल, अशी माहिती शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी दिली.

दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग म्हणाले, लोकशाही वाचवा अराजकता हटवा या मोर्चाची सुरवात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळास अभिवादन करून होणार आहे. हा पायी मोर्चा इम्पेरियल चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा मार्केट यार्ड चौक, महात्मा ज्योतिबा फुले पुतळा माळीवाडा मार्गे कापड बाजार, तेलीखुंट, चितळे रोड ते दिल्लीगेट मार्गे काढण्यात येणार आहे. या मोर्चाची सांगता दिल्लीगेट येथे विराट जाहीर सभेने होणार आहे.

जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर म्हणाले, लोकशाहीच्या रक्षणासाठी व विरोधकांच्या भीडतंत्राच्या विरोधात या मोर्चाचे आयोजन केले आहे. यामध्ये आजीमाजी आमदार, नगरसेवक, नगर शहरातील व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे

दिनांक : २० ते २६ नोव्हेंबर 2026

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



रामायण

SCREEN - 1
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)

SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.00 PM 200/- (2D)

ओम चॅप्टर-१ SCREEN - 2 बंधू (मराठी)



09.00 PM 150/-



06.00 PM 150/-

आशा
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
रुक्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर



जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली जागेसह बांधकाम मिळकतीचे विद्यमान मालक जिम्मी किशोर विराणी रा. अजय गॅस एजनसी जवळ, बुरुडगांव रोड ,अहिल्यानगर यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर जागेसह बांधकाम मिळकतीचे विक्री करण्याचा नोंदणीकृत करार आमचे अशिलांबरोबर करुन कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तरोच विद्यमान मालक यांनी वर नमुद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा व ताबा आमचे अशिलाचे लांभात दिला आहे व तशी ताबा पावती करुन दिलेली आहे. सदर मिळकतीवर पूर्णवादी नागरिक सहकारी बँक मर्यादित अहिल्यानगर यांचा कर्जाचा बोजा असुन इतर कोणत्याही वित्तीय संस्था सोसायटी, राष्ट्रीयकृत बँक, सावकार व इतर यांचा कोणताही कर्जाचा बोजा नसल्याबाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, कर्ज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस, रद्दलेख, साठेखत, खरेदीखत कोणतेही हक्क व अधिकार व हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन – जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील शहरनगर येथील जागेसह बांधकाम मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

सिटी सर्व्हे नं.	क्षेत्रफळ चौ. मी.	चतु:सिमा			
		पुर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
२६९४/ए	१३.४०	सिटी सर्व्हे नं. २६९४/बी	सिटी सर्व्हे नं. २६९३	सिटी सर्व्हे नं. २६९३	रोड

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक जागेसह बांधकाम मिळकत
दि.२१/११/२०२६, अहिल्यानगर

ॲड. उषा राजाराम जगदाळे (पटेल)
पत्ता : समर्थ स्कुल जवळ, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर
मो- ८८८८८८१९९

AHMEDNAGAR CLUB LIMITED

CIN U92413PN1947PTC005819 Dt.09/05/1947
Camp Area, Near Fort, Ahilyanagar - 414002,
Ph.: 0241-2323000, 2323947, 9423793947
Email : aclahmednagar@ gmail.com | www.ahmednagarclub.com

- Notice -

79TH ANNUAL GENERAL MEETING

NOTICE is hereby given that the 79th Annual General Meeting of the members of the Company will be held on **Sunday, 13th December 2026** at **11.00 a.m.** at the Company's Registered Office, Near Ahmednagar Fort (Camp), Ahilyanagar - 414001,Maharashtra.

The agenda of the meeting, comprising ordinary and special business, along with the audited Balance Sheet and Profit & Loss Account of the Company for the financial year ended 31st March 2026 (together with the Directors Report and other required documents), has been circulated to all members, through email and other electronic communication media.

All members are requested to take note of the same and attend the meeting.

By Order of the Board of the Directors.

Sd/- **Mr. Narendra Firodia**
Secretary & Director
Ahmednagar Club Limited
DIN : 01476810

Date : 19-11-2026
Place : Ahilyanagar

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 20 ते २६ नोव्हेंबर 2026

मैत्रेय (मराठी) 12:30 PM


बंधू (मराठी) 01:45 PM


जिजाई (मराठी) 04:45 PM


आधी अनंत (मराठी) 06:45 PM


Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत या विद्यमान मालक **योगेश्वर प्रकाश घोडके रा. सर्व्हे नं. ७६/२/३,प्लॉट नं.३७/३८/०१, वॉटर टँक जवळ साईनगर, बोल्हेगाव अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विदयमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीवर स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे कर्ज आहे.व्यातिरिक्त सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका आहिल्यानगर हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे बोल्हेगाव येथील सर्व्हे नं. ७६/२/३ प्लॉट नं. ३७/३८/२ याचे क्षेत्र ८८.३७ चौ.मी.हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील रो हाऊस नं.३ याचे आरसीसी स्ट्रक्चरमधील तळमजल्याचे बांधकाम क्षेत्रफळ ५६.२४ चौ.मी. ही संपूर्ण मिळकत.**

यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे.

पुर्वेस :- सर्व्हे नं.८२ पैकी,
दक्षिणेस :- प्लॉट नं.३७/३८/१ (रो हाऊस नं.४),
पश्चिमेस :- ६ मी. रस्ता,
उत्तरेस :- प्लॉट नं.३७/३८/३ (रो हाऊस नं.२),
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर, दिनांक :- २१/११/२०२६

ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
ॲड. ओंकार पंडीत मोरे
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **ठकूबाई तुकाराम तागड, हरिभाऊ तुकाराम तागड, पारुबाई साहेबराव कजबे, नंदा भाऊसाहेब तागड व अविनाश भाऊसाहेब तागड सर्व रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे अशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याअन्वये विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी बोलणी केली आहे. सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकूम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात(७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करून द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :-
डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे गिस्तबाग येथील सर्व्हे नं. १३/४पै. याचे एकूण क्षेत्र 0हे. ३0आर, याचा आकार १रु. ३२पै. यापैकी विद्यमान मालक ठकूबाई तुकाराम तागड, हरिभाऊ तुकाराम तागड व पारुबाई साहेबराव कजबे यांच्या मालकीचे सामाईक क्षेत्र 0 हे. 0७.१६आर. व विद्यमान मालक नंदा भाऊसाहेब तागड व अविनाश भाऊसाहेब तागड यांच्या मालकीचे सामाईक क्षेत्र 0 हे. १0.३४ आर. असे एकुण 0हे. १७.५0 आर. हे संपूर्ण क्षेत्र.**

यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वेस – सर्व्हे नं. १३/४ पैकी, दक्षिणेस – सर्व्हे नं. १४,
पश्चिमेस – सर्व्हे नं. १३/४पैकी उर्वरित क्षेत्र,
उत्तरेस – १८ डी पी रस्ता,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर,दिनांक – २१/११/२०२६

ॲड. ओंकार पंडित मोरे
ऑफिस- महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. नं. ८२०८१५४०२६

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **बाबासाहेब जबाजी भिंगारदिवे, हिराबाई भानुदास डहाणे, ठकूबाई पांडूरंग देठे व लीला तुळशीराम पाडळे सर्व रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुष खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याअन्वये विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी बोलणी केली आहे. सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात **(७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :- डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे बोल्हेगाव येथील शेत जमिनीचा सर्व्हे नं. ९१/१ याचे क्षेत्रफळ १हे. २७.००आर. + पो. ख. 0हे. 0२ आर. असे एकूण क्षेत्र १हे. २९आर. याचा आकार ६रु.६३पै. यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे सामाईक क्षेत्र 0 हे २३. २५आर. हे संपूर्ण क्षेत्र.**

यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वी :- सर्व्हे नं. ९२, दक्षिण :- सावेडी-बोल्हेगाव रस्ता,
पश्चिम :- सर्व्हे नं. ८७,८८,९0,
उत्तर :- सर्व्हे नं. ९१/१ पैकी उर्वरित क्षेत्र,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर,दिनांक – २१/११/२०२६

ॲड. ओंकार पंडित मोरे
ऑफिस- महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. नं. ८२०८१५४०२६

जाहीर लिलाव

अध्यक्ष, मुख्याध्यापक जि. प. प्रा. शाळा व्यवस्थापन समिती शिराढोण, केंद्र वाळकी, ता. जि. अहिल्यानगर यांचेकडून कळविण्यात येते की, मौजे शिराढोण ता. अहिल्यानगर येथील जि. प. प्रा. शाळेच्या मालकीच्या जुन्या ३ स्लॅब वर्ग खोल्यांचा लिलाव करण्यात येत आहे. सदर लिलाव सोमवार दि. ३0/११/२०२६ रोजी सकाळी ठिक १0.00 वा. जि. प. प्राथ. शाळा शिराढोण येथे होणार आहे. तरी लिलावधारकांनी हजर राहावे ही नम्र विनंती

लिलाव अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील याची नोंद घ्यावी.

१) लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु. ५,000 भरणे आवश्यक.
२) लिलाव मंजूर झाल्यानंतर रक्कम न भरल्यास फेरलिलाव करण्यात येईल. याचा हक्क शाळा व्यवस्थापन समिती जि. प. शाळा शिराढोण यांनी राखून ठेवला आहे.
३) लिलावाची योग्य किंमत न आल्यास लिलाव मंजूर करणे अगर नामंजूर करण्याचा हक्क शाळा व्यवस्थापन समिती जि. प. शाळा शिराढोण यांनी राखून ठेवला

विकणे/भाड्याने देणे
सारसनगर येथे नवीन
3BHK
बंगला विकणे आहे
2BHK
फ्लॅट भाडयाने आहे
9604914748

विकणे आहे
शिंप्पी गल्ली तेलीखुंट, कापड बाजारजवळ असलेली
४१० स्क्रे. फुट
जागा विकणे आहे.
8010150186

दुकान/ऑफिस भाड्याने देणे
जुना टिळकरोड राज पॅलेस हॉटेलजवळ
दुमजली २००+२०० स्क्वे.फूट
फुल फर्निचरसह ऑफिस,
दुकान,भाड्याने देणे आहे.
9075042457

प्लॉट विकणे
टाकळी काझी,
जामखेड रोड येथील
१६१४ स्क्रे. फुट
कलेक्टर **N.A.**
प्लॉट त्वरीत
विकणे आहे.
लाईट, रोड, उत्तम नागरी परिसर,
स्वतंत्र ड्रेनेजलाईन व पाण्याची सोय
समर्थ सिटी
नगर जामखेड रोड टाकळी काजी
४१४२०१ तालुका जिल्हा अहिल्यानगर
9822791855

नगर-पुणे पुणे-नगर डेली सर्व्हिस
पिकअप ड्रॉप होम सर्व्हिस
६ सिटर प्रायव्हेट आरामदायक
एसी व सुरक्षित सेवा
9561281627

Bajaj, Prestige सर्व्हिस सेंटरसाठी
लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत
आनंदी बाजार चौक, दादाचौधरी शाळेच्या मागे, अहिल्यानगर
9225948666

कापडबाजार, तेलिखुंट चौकात रेडिमेड कापड दुकानासाठी
सेल्समन पाहिजे
9657353541
8830281321

पाहिजेत
एका नामांकित कॅफेसाठी
साऊथ इंडियन कूक : ४
कॉफी मेकर : ४
7057055199
9604388607

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी व निर्व्यसनी कारागीर पाहिजेत
* कारागीर – ४
* हेल्पर – ६
प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२,एमआयडीसी,
अहिल्यानगर
9822499210
9657646555

पाहिजेत
नामांकित कंपनी
हॅप्पी मेडिकेअर
सावेडी, अहिल्यानगर येथे नामांकित कंपनीत ऑफिस कामासाठी मुली व मुले पाहिजेत.
शिक्षण -१२ वी पास व पदवीधर,
वयोमर्यादा १९ ते ३० पर्यंत
संपर्क
9172194775
8459809981

पाहिजेत
रजिस्टर्ड
फार्मासिस्ट
(जागा- २, स्त्री)
9823787910

पाहिजेत
अमुल कंपनीचे आईस्क्रीम व डेअरी (FMCG) उत्पादन विक्रीसाठी
डिलिव्हरी बॉय- २ जागा
(ड्रायव्हर असल्यास प्राधान्य)
सेल्समन - २ जागा
ऑफीस असिस्टंट/
अकौंटंट - १ जागा
(अपेक्षित पगार मिळेल. प्रत्यक्ष भेटावे)
PRAGATI FROZEN FOODS
नायरा पेट्रोल पंम्पजवळ
बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर
9225324648

पाहिजेत
अहिल्यानगर शहर व जिल्हा करीता सर्व कंपनीचे लुब्रीकेंट आईल व ग्रीसचे मार्केटींग करण्याकरीता
अनुभवी सेल्स ऑफीसर पाहिजे
(आकर्षक पगार+भत्ता)
एस के ट्रेडींग कंपनी
मार्केटयार्ड हमाल पंचायत समोर, अहिल्यानगर
7507100662 / 9545750753

जागा भरणे आहे
क्लार्क – (जागा १)
पात्रता: B.Com, M.Com., संगणकीय ज्ञान आवश्यक, अनुभव असल्यास प्राधान्य
पी.आर.ओ – (जागा १)
पात्रता: कुठल्याही शाखेचा पदवीधर, उत्कृष्ट संभाषण कौशल्य, अनुभव असल्यास प्राधान्य
तरी इच्छुकांनी आवश्यक त्या कागदपत्रासह आपले अर्ज दिनांक ३०/११/२०२६ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात जमा करावे
पंडीत दीनदयाळ नागरी सह. पतसंस्था मर्या.
आनंदी बाजार अहिल्यानगर-४१४००१

Required
Civil Engineer
(2 Nos)
Experience 0 to 2 year
Supervisor
(2 Nos)
Experience 1 to 2 year
CONTACT
7030416194

WANTED
Engineers
B.E./Diploma,
(civil, computer)
CONTACT
9284110220
9604724295

Aanand Global Foundation's
AANANDRUSHIJI INSTITUTE OF PARAMEDICAL, FIRE & INDUSTRIAL SAFETY
IN FRONT OF HDFC BANK, NAGAR - PUNE ROAD, KEDGAON, AHILYANAGAR-414005 (M.S.)
Contact: 7276813199/9145155755, Email: 63361principal@msbte.ac.in INSTITUTE CODE: 63361

WALK-IN-INTERVIEW
For the Following posts are arranged in College Office on 25/11/2026 at 11.00 am

Sr. No.	Designation	No.of Posts	Qualification & Experience
1	Principal	01	Education Qualification & Experience are as per the existing MSBTE, Mumbai
2	Lecturer	06	1.MD(Path)/DCP/DNB/DPB/M.Sc Microbiology, M.Sc. Biochemistry - 02 2.Degree in Engineering or Any Graduate with Diploma Fire Service Engineering – 01 3.Degree in Engineering or Any Graduate with Advance Diploma in Industrial Safety – 02
3	Lab Technician	03	Graduation in Science
4	Clerk	01	B.com /M.com
5	Librarian	01	B.Lib /M.lib
6	Accountant	01	B.Com
7	Lab Attendant	02	HSC
8	Peon Cum Safai Kamgar	01	SSC
9	Driver	01	Driving License must

Mr.Hiralal Lunawat (President)

वृध्देश्वर अर्बन
मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. श्रीगोंदा

वृध्देश्वर अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
मुख्यालय : ता.श्रीगोंदा,जि. अहिल्यानगर

भव्य कर्मचारी भरती २०२६
सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!! सुवर्णसंधी!!!

शेतकरी, महिला व सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या तसेच सहकार क्षेत्रात वेगाने प्रगती करणाऱ्या **वृध्देश्वर अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.** या संस्थेच्या विविध शाखांसाठी अनुभवी, होतकरू व कार्यक्षम उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

भरतीसाठी शाखा: दौंड | केडगाव स्टेशन | श्रीगोंदा | पंढरपूर | पारगाव सुद्रिक | अहिल्यानगर | आळंदी | पारगाव फाटा | सदाशिव पेठ | जामखेड | चन्होली

अ.क्र.	पदाचे नाव	पदसंख्या
१.	शाखा अधिकारी (Branch Officer)	०३
२.	सहाय्यक शाखा व्यवस्थापक (Assistant Branch Manager)	०६
३.	रिकव्हरी ऑफिसर (Recovery Officer)	१०
४.	प्रकल्प समन्वयक (Project Coordinator)	०१
५.	सामाजिक कार्यकर्ता / क्षेत्रीय अधिकारी (Social Worker / Field Officer)	०२
६.	मार्केटिंग ऑफिसर (महिला व पुरुष) (Marketing Officer)	१०
७.	टेलिकॉलर (Telecaller)	०५
८.	क्लार्क (Clerk)	१०
९.	महिला बचत गट समन्वयक (Women SHG Coordinator)	१०
१०.	शिपाई (Peon / Office Boy)	०३
	एकूण रिक्त जागा	६२

शैक्षणिक पात्रता व अनुभव
- **सहाय्यक शाखा व्यवस्थापक :** पदवीधर / एम.कॉम. / एमबीए फायनान्स. बँकिंग किंवा सहकार क्षेत्रातील अनुभव आवश्यक.
- **शाखा अधिकारी :** कोणत्याही शाखेतील पदवीधर. बँकिंग, फायनान्स किंवा सहकार क्षेत्रातील १ ते २ वर्षांचा अनुभव प्राधान्य.
- **रिकव्हरी ऑफिसर :** किमान १२ वी उत्तीर्ण / पदवीधर. बँकिंग, फायनान्स किंवा कर्ज वसुली क्षेत्रातील अनुभव आवश्यक.
- **प्रकल्प समन्वयक :** कोणत्याही शाखेतील पदवीधर / MSW. सामाजिक कार्य, कर्मचारी व्यवस्थापन किंवा संबंधित क्षेत्रातील अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.
- **सामाजिक कार्यकर्ता / क्षेत्रीय अधिकारी :** BSW / MSW / पदवीधर. सामाजिक विकास प्रकल्प, गावपातळीवरील समन्वय व क्षेत्रीय कामाचा अनुभव प्राधान्य.
- **मार्केटिंग ऑफिसर :** किमान १२ वी उत्तीर्ण / पदवीधर. मार्केटिंग, सेल्स किंवा फायनान्शियल क्षेत्रातील अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.
- **टेलिकॉलर :** किमान १२ वी उत्तीर्ण. उत्तम संवाद कौशल्य तसेच मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान.
- **क्लार्क :** बी.कॉम. / कोणत्याही शाखेतील पदवीधर, संगणक ज्ञान व अकाउंटिंगचे प्राथमिक ज्ञान आवश्यक.
- **महिला बचत गट समन्वयक :** ग्रामीण भागात काम करण्याची तत्परता असलेल्या महिलांना प्राधान्य. शैक्षणिक पात्रतेची कोणतीही अट नाही.
- **शिपाई :** किमान १० वी उत्तीर्ण. प्रामाणिक, शिस्तप्रिय व जबाबदारीने काम करणारे.

उमेदवारांसाठी विशेष सूचना
- अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
- संगणकाचे ज्ञान व उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक.
- आकर्षक वेतन व संस्थेच्या नियमानुसार इतर सुविधा उपलब्ध.
- इच्छुक उमेदवारांनी आपला अद्ययावत बायोडाटा (Resume) व शैक्षणिक कागदपत्रे खालील ई-मेलवर पाठवावीत.

ई-मेल : chaitanyabio2025@gmail.com
अर्ज पाठविण्याची अंतिम मुदत : ३० नोव्हेंबर २०२६
मुलाखतीचे ठिकाण : वृध्देश्वर अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. वरद टॉवर, बंगाल चौकी, माळीवाडा, अहिल्यानगर. संपर्क : ९५२३२४१८९८



स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,स्रग व
थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...
अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८



१७ वे पुण्यस्मरण
हास्य तुझे स्मरते आजही
आवडते तुझे लडीवाळ बोलणे,
काळवान्याची झुळुक आली,
प्रकाशमान ज्योत क्षणार्धात विझुन गेली!
कै.श्रीमती गोदावरीबाई शामसुंदर टाक
स्व.दि. २२.११.२००९
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली
* दुःखांकित *
रविंद्र शामसुंदर टाक । किशोर शामसुंदर टाक
सचिन रविंद्र टाक । ॲड.सागर रविंद्र टाक
वेदांत किशोर टाक । कु. वृंदा सचिन टाक
समस्त टाक परिवार

2x2 पुशबॅक सिट, AC, एअर सस्पेन्शन लक्झरी, 49 सिटर बसने प्रवास
११ मारुती दर्शन
दि. २५/२६/२७ डिसेंबर २०२६
श्री समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनासह नरसोबाची वाडी, मोरगांव इ.
३ दिवस

रेल्वे प्रवास AC 3 टियर कोच
राजस्थान स्पेशल मेवाड व मारवाडसह
दि. ३१ जाने. ते १३ फेब्रु. २०२७
जोधपूर, जैसलमेर, जयपूर, बिकानेर, पुष्करतिर्थ, चितोडगड, उदयपूर, माऊंटअबु, खाटुश्याम, सालासार बालाजी
१४ दिवस
बुकींग अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२६

2x2 पुशबॅक सिट, AC, एअर सस्पेन्शन लक्झरी, 49 सिटर बसने प्रवास
नर्मदा परिक्रमा
दि. १८ मार्च ते ३ एप्रिल २०२७
शेगांव, ओंकारेश्वर, प्रकाशा, बडवानी, बिमलेश्वर, निलकठेश्वर, नारेश्वर, गरुडेश्वर, महेश्वर, उज्जैन, नेमावर, जबलपूर, अमरकंटक, महाराजपूर, होशंगाबाद
१७ दिवस

संपर्क
श्री रेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस (यात्रा कंपनी)
ऑफीस : शॉप नं. ३, नीलम प्रोव्हिजन स्टोअर्सशेजारी, पोलीस कॉलनी, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर.
श्री. शाम क्षीरसागर 9922240515 9405032698
सौ. दिपा जोशी 8379841261 9404401699

१५ वे पुण्यस्मरण / ४१ वे पुण्यस्मरण



स्व. हस्तीमलजी हिरालालजी कटारिया (काका) स्व.दि. २१/११/२०११
स्व.सौ. कमलाबाई हस्तीमलजी कटारिया स्व.दि. 8 / 6/1985
संस्कार, स्नेह, सहानुभूती या तत्वातुन घडली, आपल्या जीवनाची अमृतगाथा..
प्रेरणा देत राहतील आपल्या स्मृती आम्हां सदैव आता...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली
* दुःखांकित *
मदनलाल हस्तीमल कटारिया| विलासलाल हस्तीमल कटारिया
अमोल । ललित । धनेश । गणेश । तिर्थेश । जगदीश । गितांश
मनिषजी कांतीलालजी गुगळे
कटारिया परिवार, (पाडळीवाला) दाळमंडई, अ.नगर.

भावपूर्ण श्रध्दांजली



ज्योत अनंतात विलीन झाली, स्मृती आठवणींना दाटून आली.. भाव सुमनांची ओंजळ भरुनी वाहतो आम्ही श्रध्दांजली!
कै.पद्माकर (पदू) कोंडिराम खेत्रे
स्व.मंगळवार दि.१४/११/२०२६
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
दशक्रिया विधी
सोमवार दि.२३/११/२०२६ रोजी
स. ८ वा.अमरधाम, नालेगाव,अहिल्यानगर येथे होईल.
: दुःखांकित :
चंद्रकांत माणिक खेत्रे (कांताशेठ) । बाळासाहेब माणिक खेत्रे
अमोल चंद्रकांत खेत्रे । सागर अरुण खेत्रे
युवराज अरुण खेत्रे । महेश चंद्रकांत खेत्रे
समस्त खेत्रे परिवार, अहिल्यानगर

Career Ki Shuruvat DiSHA ke saath
MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR , IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
दिल्ली गेट शाखा
आनंद फेशन हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, चहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769
जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड जवळी, अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रूपा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769

२५ वे पुण्यस्मरण



तुमचं असणं आमच्यासाठी सर्व काही होतं! तेच आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं आज सर्व काही असल्याची जाणीव आहे !पण तुमचं आमच्यात नसणं हीच मोठी उणीव आहे
स्व.ऐंशीलाल द्वारकादास पुरस्वाणी
स्व.२२/११/२००१
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली..
- दुःखांकित -
पुरस्वाणी परिवार
महाराष्ट्र ॲटो इलेक्ट्रीक वर्क्स
मो : 9850044442 अहिल्यानगर
हिंदुस्थान ॲटो बॅटरी वर्क्स
भारत इंडस्ट्रीज, एम.आय.डी.सी., अ.नगर

फ्रेश स्टॉक
महावीर मॉल...
स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच कृपया मॉलला भेट द्यावी.
जेन्टस-लेडीज स्वेटर, जर्किन, हुडी, अप्पर, मफलर, हँड ग्लोज, उलन कॅप सर्व साईझमध्ये आणि होलसेल दरात..
सरसकट २०% डिस्काऊंट..



मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ,मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

फ्लेक्स प्रिंटींग संपर्क :9403232323